# माणूस

शनिवार । ७ जुलै १९७९ । ७५ पैसे


अमेरिका, रशिया इ. देशांना परवडणारी अर्थनीती आम्हाला मानवणार नाही. अती प्रगत तंत्रज्ञान आम्हाला झेपणार नाही. त्यामुळे आमच्या गरजा व आमची शक्ती ओळखूनच आम्ही विकासाचा आराखडा तयार करू. समाजवाद ही एक ढोबळ कल्पना आहे. आमच्या देशाच्या दृष्टीने तिचा योग्य अर्थ लावून आम्ही आर्थिक, सामाजिक वाटचाल करीत राहू.

## विश्वेश्वर प्रसाद कोइराला यांची मुलाखत

पृष्ठ.........८

आज देशात सर्वत्रच अस्थिरतेचे वातावरण आहे. कामगारनेत्यांनी त्यात भर घालू नये. कामगारांच्या न्याय्य मागण्यांसाठी जरूर लढा द्यावा. पण ते करत असताना चुकीची व विपर्यस्त माहिती देऊन कामगारांची आणि इतर नागरिकांची दिशाभूल मात्र करू नये.

## बजाज ऑटो संप : दुसरी बाजू

पृष्ठ.........२

' तेलीचेरीमध्ये आमची हानी होण्याचं मुख्य कारण आमचा संयम हेच आहे; पण सरकारने जर आपला थंडपणा सोडला नाही तर आम्हालाही काही तरी निश्चित कृती करावी लागेल. ' तेलीचेरीतील चकमकीं-बाबत केरळातील मार्क्सवाद्यांची ही प्रतिक्रिया आहे आणि प्रभावी प्रचारमाध्यमांच्या सहाय्याने त्यांनी ती सामान्य माणसावर ठसविण्याचा सतत प्रयत्न केला आहे.

## कुरुक्षेत्र केरळ

पृष्ठ.........१०

## सप्रेम नमस्कार....

# बजाज ऑटो : दुसरी बाजू

¤ दि. ३० जूनच्या 'माणूस' चा अंक वाचला. मुखपृष्ठावरीलच 'बजाज–ऑटो-मधील गोळीबाराच्या निमित्ताने' या शीर्षकाने लक्ष वेधून घेतले. संपूर्ण लेख काळजीपूर्वक वाचला. कामगारांची बाजू मांडण्याचा, त्यांच्या न्यायासाठी भांडण्याचा उपक्रम स्तुत्य आहे; परंतु त्यामध्ये काही मुद्दे तार्किकदृष्ट्या विसंगत वाटले, तर काही माहिती मुळातच विपर्यस्त व चुकीची वाटली. कामगारांचे राहणीमान सुधारावे, त्यांना अधिक सुविधा उपलब्ध करून दिल्या जाव्यात, कारखान्याच्या समृद्धीमध्ये त्यांचाच वाटा महत्त्वाचा असतो तेव्हा ते केंद्रस्थानी असले पाहिजेत, हे सर्व बरोबर आहे; परंतु म्हणून दुबळा युक्तिवाद किंवा चुकीची माहिती समर्थनीय ठरू शकत नाही.

सुरुवातीलाच असे म्हटले आहे की, 'मार्च ७९ ला आणीबाणीत झालेल्या कराराची मुदत संपली. आता औपचारिकदृष्टचाच नवीन करार सुरू होणे आवश्यक होते. कामगारांनी परत निर्मितिक्षमतेच्या जाचक अपेक्षा सौम्य कराव्यात अशी मागणी केली....त्यात व्यस्थापनाने आता चालू असलेली निर्मितिक्षमता तीच १००% धरा मग ७५ रु. वाढ देऊ आणि त्यापुढे मग बोलू, अशी भूमिका घेतली. आता निर्मितिक्षमतेच्या अपेक्षा जाचक नसाव्यात, ही मागणी योग्य आहे. पण या अपेक्षा जाचक आहेत किंवा नाहीत, हे कुणी ठरवायचं ? कारण हा प्रकार अतिशय सापेक्ष आहे. शिवाय कोणतेही व्यवस्थापन असे म्हणू शकते की, आमच्या कामगारांकडून अपेक्षा इतक्या आहेत, जे त्या पुऱ्या करू शकत असतील, ज्यांची तशी इच्छा असेल, त्यांनी राहावे, बाकीच्यांनी काम सोडून द्यावे, असे म्हणणे कदाचित उद्दामपणाचे ठरू शकेल, पण अतार्किक निश्चितच नाही, तेव्हा याबाबतीत कामगार संघटना फार तर एक तटस्थ लवाद नेमून खरोखरच कामगारांची पिळवणूक होत आहे का, याची चौकशी त्या लवादामार्फत केली जावी, अशा मागणी करू शकेल. पण स्वतःच ते ठरवू शकणार नाही. आता कामगारनेत्याचे पुढले अर्ग्युमेंट असे असते की, मॅनेजमेंट त्या लवादालाच पैसे चारेल; पण मग यावर उपाय स्वतःच कायदा हातात घेणे हा नसून ज्याच्या हाती कायदा देणे सुरक्षित वाटेल अशी व्यक्ती शोधणे आणि तिच्यामार्फत या प्रकाराची शहानिशा करवून घेणे हा आहे. मला हे मान्य आहे की, आज-काल अशी व्यक्ती मिळवणे अतिशय कठीण झाले आहे; पण सुदैवाने अजून ते अशक्य झालेले नाही.

१६ जूनच्या प्रसंगाबद्दल या लेखात असे सांगण्यात आले आहे की, '१६ जूनला भिगारदिवे आणि बावधनकर यांना व्यवस्थापनाकडून शो-कॉज नोटिसा आल्या. शो-कॉज नोटिस ही चार्जशीटच्या आधीची औपचारिकता असते. त्यामुळे कामगार परत अस्वस्थ झाले.' ही माहिती संपूर्णपणे चुकीची आणि विपर्यस्त स्वरूपात देण्यात आली आहे. याबद्दलची वस्तुस्थिति अशी आहे की, काही दिवसांपूर्वी प्रत्येक पाळीत एक तास बैठा संप करण्यासाठी कामगारांना चिथावल्याबद्दल संघटनेच्या दोन नेत्यांना १६ जून रोजी व्यवस्थापनाकडून अशा कृत्यापासून परावृत्त होण्यासंबंधीची 'उपदेशपत्रे' देण्यात आली. (या बैठ्या संपाचा आदेश आपण दिला नसल्याचे बजाज–ऑटो कामगार संघटनेचे अध्यक्ष व सेक्रेटरी रूपमय चटर्जी यांनी स्वतःच व्यवस्थापनाजवळ मान्य केले आहे.) या उपदेशपत्रांमध्ये त्यांच्याविरुद्ध कोणतीही कारवाई करण्यात येणार नाही, असे स्पष्टपणे नमूद केलेले असतानाही या दोन नेत्यांना 'शो–कॉज नोटीस' देण्यात आली आहे. असा कामगारांमध्ये गैरसमज पसरवण्यात आला. या पत्रांवर 'शो–कॉज नोटिस' किंवा 'वॉर्निंग लेटर' असं काहीही लिहिलेलं नव्हतं. व्यवस्थापनाकडून नुकतंच सर्व कामगारांना जे पत्र गेलं आहे त्यामध्येही याचा स्पष्ट उल्लेख आहे. या जर खरोखरच शो–कॉज नोटिसा असतील तर कामगारनेत्यांनी ती पत्रे सादर करावीत म्हणजे व्यवस्थापन दिशाभूल करीत असल्याचा आरोप शाबीत होऊ शकेल. कारण हाच खुलासा व्यवस्थापनाने घेतलेल्या पत्रकार–परिषदेतही करण्यात आलेला आहे. आणखी एक छोटासा खुलासा म्हणजे, 'गडबडीची बातमी ऐकून रूपमय

**साप्ताहिक माणूस**

वर्ष : एकोणिसावे
अंक : सहावा
७ जुलै १९७९
किंमत : ७५ पैसे

संपादक
**श्री. ग. माजगावकर**
साहाय्यक
**दिलीप माजगावकर**
**सौ. निर्मला पुरंदरे**
वार्षिक वर्गणी :
**चाळीस रुपये**

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.
**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४ ३४५९

चटर्जींनी १६ तारखेला रात्रीच व्यवस्थापनाला फोन करून सकाळी मी येतो, मग कारखाना उघडण्याची चर्चा करू. असे सांगितले' असं आपल्या अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखात म्हटले आहे. श्री. चटर्जींनी हा फोन १६ तारखेला रात्री केला नसून १७ तारखेला सकाळी ७ ते ७-१० दरम्यान केला होता. कारण कामगारांना वीजकपातीबद्दल ले-ऑफ द्यायचा की सरळ टाळेबंदीच जाहीर करायची यासंबंधीचा निर्णय श्री. राहुल बजाज यांनी व्यवस्थापनाबरोबर चर्चा करून रात्री अडीच वाजता घेतला.

ले-ऑफच्या काळात कामगारांना कार्ड पंच करायला का लावले, हा कामगारनेत्यांचा एक महत्त्वाचा प्रश्न. याचं मुख्य आणि सरळ उत्तर म्हणजे आजपर्यंतचा तो रिवाज आहे आणि त्यात नियमबाह्य काहीही नाही, मागे बजाज-ऑटो जेव्हा ४५ दिवस बंद होता तेव्हाही कामगार रोज येऊन कार्ड पंच करून (हजेरी लावून) जात होतेच आणि कॉलेजातल्या प्राध्यापकांनासुद्धा जर अभ्यासक्रम संपवल्यानंतरही टर्म संपेपर्यंत रोज कॉलेजात जाऊन सही करून यावं लागतं तर कामगारांना त्यात एवढा प्रतिष्ठेचा प्रश्न करण्याचं काय कारण? 'कार्ड पंच करण्याची जर जरुरी होती तर १७ जूनला सकाळी बसेस का सोडल्या नाहीत,' हीही कामगारनेत्यांची एक पृच्छा आहे. त्याचेही उत्तर सरळ आणि सोपं आहे. तसं करणं व्यवस्थापनाला असुरक्षिततेचं वाटलं. कारण आदल्याच दिवशी कामगारांनी पोलिसांशी झालेल्या चकमकीत कारखान्यातले जॉब्स उचलून फेकायला सुरुवात केली होती, हे कामगार-नेत्यांनीही मान्य केलं आहे. त्यामुळे त्यांनी बसेसचीही नासधूस केली नसतीच, याची हमी देणं कठीण होतं.

लेखामध्ये पुढे म्हटलं आहे, 'कारखान्याच्या गेटबाहेर कामगार जमले होते. कार्ड पंच करायला एका वेळी आठहून अधिकांना आत जायचे नाही, असे पोलिस व सिक्युरिटीने जाहीर केले. का तर परत गडबड होईल. या वेगाने हजार-दीड हजार कामगारांना हजेरी लावण्यासाठी दुपार उजाडली असती. म्हणून कामगार अस्वस्थ झाले.' आता सकाळच्या शिफ्टचे एकूण कामगार पंधराशे. त्यापैकी निम्म्याहून अधिक कामगार बसेसची सोय नसल्यामुळे पुण्याहून येऊच शकले नव्हते. (अभिनिवेशाच्या नादात ही गोष्ट पुढे पान तीनवर कामगारनेत्यांनीही मान्य केली आहे.) म्हणजे फार तर सात-आठशे कामगारांना हजेरी लावायची होती आणि याकरिता दोन-तीन तासांपेक्षा अधिक वेळ लागला नसता, असं व्यवस्थापनाचं म्हणणं आहे. शिवाय व्यवस्थापनाचा असाही आरोप आहे की, दुसऱ्या आणि तिसऱ्या शिफ्टचे बरेच कामगार घरी गेलेच नव्हते आणि त्यामुळे गेटाबाहेर एवढा हजार-दीड हजार कामगारांचा जमाव जमला होता म्हणजेच कामगारांची ही हुल्लडबाजी पूर्वनियोजित होती.

काही वेळा कामगारसंघटनादेखील ताकदीच्या जोरावर व्यवस्थापनाला नमवण्याचा कसा प्रयत्न करतात याचे एकच उदाहरण देतो आणि हा छोटासा खुलासा संपवतो. पुण्यामधीलच एक मोठा कारखाना आहे. या कारखान्याने कामगारांसाठी अशी सुविधा निर्माण केली की, कंपनीच्या बसेस कारखान्यातून पुणे शहरामध्ये जात असतातच, तेव्हा कामगारांचे पाहुणे, नातेवाईक यांपैकी कुणाला जर शहरात जायचं असेल तर तेही या बसेसमधून जाऊ शकतील. फक्त त्याबद्दल त्यांनी प्रत्येकी साठ पैसे भाडं द्यावं. पी. एम. टी.चा दर ८५ न. पै. आहे. शिवाय या बसेस केवळ शिवाजीनगर किंवा अलका टॉकीजपर्यंतच जाऊन थांबणार नाहीत, तर स्वारगेट किंवा कॅंपमध्येही जातील व संबंधित पाहुणे किंवा नातेवाइकांना इच्छित स्थळी पोचवतील. असं करण्याबद्दल कोणतंही जादा भाडं आकारण्यात येणार नाही. सध्या तेलाच्या किमती वाढल्या आहेत, वाढत आहेत, आणखीही वाढण्याची शक्यता आहे. तेव्हा कंपनीच्या व्यवस्थापनाने असा विचार केला की, बसचं भाडं साठ पैशांवरून ऐंशी पैशांवर न्यावं. हे सगळं अजून proposal च्याच पातळीवर आहे; पण कामगारांना हे कळल्याबरोबर अशी दरवाढ केल्यास आम्ही संपावर जाऊ, अशी नोटीस युनियनच्या नेत्यांनी दिलेली आहे. सत्कृत्यचक्र सत्कृत्य करणाऱ्याचच डोकं उडवतं ते असं !

तेव्हा शेवटी सांगणं एवढंच आहे की, आज देशात सर्वत्रच अस्थिरतेचं वातावरण वाढत आहे. कामगारनेत्यांनी त्यात भर घालू नये. कामगारांच्या न्याय्य मागण्यांसाठी जरूर लढा द्यावा; पण ते करत असताना कामगारांची आणि इतर नागरिकांची दिशाभूल करू नये. भडका उडत असताना तेल ओतण्यात मर्दुमकी नसते, पाणी ओतण्यात असते. 'माणूस'सारख्या साप्ताहिकाकडूनही आज हेच अपेक्षित आहे.

**पुणे** —**एक परिचित**

□ 'माणूस'च्या एकोणिसाव्या वर्षारंभ-अंकात छाया दातारांनी पश्चिम बंगालचे व्यापक सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय व आर्थिक दर्शन घडविले याबद्दल आपल्यामार्फत त्यांना धन्यवाद.

काही बाबींवर अधिक प्रकाश टाकला असता तर सोयीचे झाले असते. उदा. नक्षलवादी चळवळ विचार आणि श्रद्धा या दृष्टीने अधिक सकस असूनही तिचे रूपांतर केवळ हिंसक साहसवादात का झाले व शेवटी ती चळवळ मूळ का धरू शकली नाही याची परखड कारणमीमांसा हवी होती.

दुसरी बाब म्हणजे पश्चिम बंगाल डाव्यांच्या प्रभावाखाली राहात आलेला आहे. डावे लोक शिक्षणप्रणालीवर अधिक भर देऊन आपल्या मतानुसार नवीन पिढी घडवीत असतात, हा रशिया, चीनचा अनुभव जगजाहीर आहे. ज्योति बसू व त्यांच्या पक्षाने सत्तेवर आल्यावर शिक्षणप्रणालीसंबंधी नेमके कोणते मूलगामी बदल केले त्याचे दर्शन घडून येत नाही. शिक्षण हा विषय राज्यांच्या कक्षेत येत असल्यामुळे केंद्रावर जबाबदारी टाकून डाव्यांना मोकळे होता येणार नाही.

गोहत्याबंदीसंबंधी तेथील लोकमानस काय आहे, ज्योति बसू खरोखरच लोकमताचे प्रतिबिंब दर्शवितात काय ?

ऑपरेशन बर्गा हा सध्याच्या डाव्या सरकारचा प्रतिष्ठेचा कार्यक्रम झाला आहे; पण हाही कार्यक्रम ठरल्याप्रमाणे डिसेंबरपर्यंत पूर्ण होईलसे दिसत नाही. उलट वस्तुस्थिती अशी आहे की, सरकारकडे दाखल झालेल्या जमिनींपैकी एक हेक्टरही जमीन डाव्या सरकारने सत्तेवर आल्यापासून वाटली नाही. सव्वाअकरा लक्ष एकर जमीन सरकारकडे दाखल झाली असून जवळपास त्यांपैकी साडेतीन लक्ष एकर जमीन वाटपयोग्य आहे. ती का वाटली गेली नाही ?

डावे सरकार सत्तेवर आल्यावर त्या सरकारने जमिनीच्या पुनर्वाटपासाठी सर्व पक्षीय समित्या कायम केल्या; पण या ना त्या कारणामुळे सरकारने त्या कार्यान्वित होऊ दिल्या नाहीत.

पंचायतीच्या निवडणुका झाल्यावर या समित्यांची पुनर्रचना करण्यात आली; पण त्याही काय करू शकल्या नाहीत. ऑपरेशन बर्गा हा कार्यक्रम कालबद्ध मर्यादेत पूर्ण करणं ही डाव्या सरकारची 'ॲसिड टेस्ट' होती असे मला वाटते; पण याही कार्यक्रमाबद्दल डावे सरकार कंबर कसून नाही. असे का व्हावे याचे करंट्स-अंडर करंट्स छाया दातारांच्या लेखातून समजून आले असते तर खूप चांगले झाले असते.

तरीदेखील जे वाचायला मिळाले त्यातून बरच काही कळले.

**औरंगाबाद** —**दिनकर बोरीकर**

परराष्ट्रीय घडामोडी । चंद्रशेखर पुरंदरे

# पाकिस्तानचा अणुबॉम्ब

## अदूरदर्शी व असंयमी हातात अमर्याद शक्ती

पाकिस्तान अणुबॉम्ब बनवण्याच्या मार्गावर आहे ही आता जगजाहीर गोष्ट आहे. हॉलंडमध्ये काम करणाऱ्या अब्दुल कादर खान या पाकिस्तानी शास्त्रज्ञाने तंत्रज्ञान आपल्या देशात आणले आणि इस्लामाबादच्या जवळ अणुशक्तिकेंद्र उभारून तातडीने पुढच्या प्रक्रियांना सुरुवातही झालेली आहे. या वर्षअखेर मुलतानजवळ किंवा सौदी अरेबियाच्या वाळवंटात कोठे तरी पाकिस्तान अणुचाचणी घेईल असा अंदाज बांधता येईल.

अणुबॉम्बचे तंत्रज्ञान आणि कच्चा माल देशोदेशीहून पाकिस्तानने मोठ्या हिकमतीने मिळवला आहे. स्वित्झर्लंड, अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स, हॉलंड या सर्वांच्या डोळ्यांदेखत त्यांच्याकडूनच हळूहळू हव्या त्या मालाची खोट्या कंपन्यांच्या नावाखाली खोटे उद्देश दाखवून आयात करण्यात आली. ती निराळीच मनोरंजक कथा आहे.

पण या कथेचे परिणाम तेवढे मनोरंजक दिसत नाहीत! दुसऱ्या एखाद्या राष्ट्राने (इस्रायलने, उदाहरणार्थ) हे कसे मिळवले हे वाचताना तटस्थता येईल; पण पश्चिम सीमेवर लागून असणाऱ्या देशाकडे हे तंत्रज्ञान आले हे धोक्याचे आहे. तीन युद्धांतील तडाख्यांच्या धक्क्यातून पाकिस्तान सावरलेले नाही. मुत्सद्दीपणाचा अभाव असणारे व विसाव्या शतकाचे भान नसणारे लष्करी नेतृत्व तिथे सत्ता गाजवत आहे आणि जेव्हा जेव्हा तिथल्या असमर्थ नेतृत्वाला आपले दोष लपवायची जरुरी भासते, तेव्हा तेव्हा भारताची भीती लोकांना घालायची आणि भारताविषयीचा द्वेष जोपासायचा एवढेच ते निष्ठेने करतात. दीर्घद्वेषी व अपरिपक्व अशा पाकिस्तानी सत्ताधाऱ्यांना त्यात 'इस्लामी जगाचा प्रवक्ता' या भूमिकेतून बोलायची भुट्टोने सवय लावली आहे. या साऱ्याचा विचार करता या गुंतागुंतीच्या प्रकरणाचे किती दिशांना, किती अंगांनी, किती गंभीर परिणाम होतील ते पहावे लागेल.

'गवत खाऊ पण अणुबॉम्ब बनवू' ही उथळ भुट्टोंची अनेक घोषणांपैकी एक घोषणा होती. (तशी हजार वर्षे लढण्याचीही एक घोषणा होती; पण ते फाशीचं मध्येच उपटलं!) साधनशुचितेचा विधिनिषेध भुट्टोंना आयुष्यात कधीच नव्हता. संधिसाधूपणा आणि कोणत्याही मार्गाने काहीही करायला व शॉर्टकट् घ्यायला हा इसम नेहमीच उत्सुक असे. त्याच्याच कारकीर्दीत याचा पाया घातला गेला. इस्लाम जगतामध्ये पाश्चात्य देशांशीही जवळीक असणारा व प्रागतिक विचारसरणीचा भासणारा दुसरा नेता नसल्याने भुट्टोला ते स्थान प्राप्त झाले. भारताने अणुचाचणी घेतल्यावर भारतद्वेषाच्या काविळीने पछाडलेल्या भुट्टोंचो तगमग वाढली. आज ना उद्या भारत हमखास बॉम्ब करणार आणि आपल्याविरुद्ध वापरणार याची त्यांना खात्री पटली. त्यात ज्या चीनची लाचारी करण्यात भुट्टोंनी आपले परराष्ट्रीय धोरण खर्ची घातले त्याच्याकडून तंत्रज्ञान मिळण्याची शक्यता दिसेना व पैशाचाही प्रश्न होताच.

त्याच वेळी इस्राएलने अणुबॉम्ब केल्याची बातमी अरबांना अस्वस्थ करीत होतीच व अजूनही करते आहे. लिबियाचा कर्नल गडाफी हा आपल्याला अरबांचा प्रवक्ता समजतो. अरब जगतात कुठे खुट्ट झाले की, गडाफीमहाराजांची जळजळीत प्रतिक्रिया त्यावर तयार असते. जहाल अरबांच्या आघाडीचा तो प्रमुख देश आणि मध्यपूर्वेतील रस्सीखेच आता तर विशेष नाजूक अवस्थेला पोचलेली आहे. कॅम्प डेव्हिडच्या करारानंतर इजिप्त अरबराष्ट्रांतून अधिकाधिक बाहेर पडला व आता सौदी अरेबिया, सीरिया या त्याच्या एके काळच्या मित्रराष्ट्रांनीही त्याला पाठ दाखवली आहे. अशा परिस्थितीत अमेरिकेला शह देणे अरबांना जरुरीचे ठरते. कारण मध्यपूर्वेत इराणपासून इस्राएलपर्यंत कोणाची लष्करी ताकद किती असावी हे रशियाची सादातने हकालपट्टी केल्यापासून अमेरिकाच ठरवते. अमेरिकेची ही ताकद त्यांना डाचत होतीच. पेट्रोडॉलर्सच्या नव्या सामर्थ्याची जाणीव झाल्यावर तर इस्राएलने अमेरिकेच्या पाठिंब्यावर आपल्याला शह द्यावा हे त्यांना पटेना. त्यासाठी अणुतंत्रज्ञान मिळवले पाहिजे हे गडाफीच्या मनाने घेतले आणि त्याची परिणती पाकिस्तानला त्याने सुमारे तीन कोटी डॉलर्स या प्रकल्पासाठी व इतर आंतरराष्ट्रीय बाजारपेठांतून हवे ते युरेनियम, यंत्रसामुग्री आणण्यासाठी दिले. त्यांच्या जोरावर पाकिस्तानचा अणुबॉम्ब तयार होऊ घातला आहे.

भारताने आपले धोरण (किंवा मोरारजी देसाईंनी आपले धोरण!) जाहीर केले आहे. पाकिस्तान किंवा कोणत्याही देशाने कितीही अण्वस्त्रे बनवली तरी भारताच्या याविषयीच्या धोरणात तसूभरही फरक पडणार नाही, असे मोरारजीभाईंचे म्हणणे. हे एकतर्फी जाहीर केलेले धोरण आहे. २९ जूनला 'दिल्ली स्टडी ग्रुप'समोर दिलेल्या भाषणात अब्दुल सत्तार या भारतातील पाकिस्तानच्या राजदूताने व्यक्त केलेली प्रतिक्रिया पाकिस्तानच्या एकूण संशयी मनोवृत्तीवर प्रकाश

पृष्ठ २२ वर

संध्याकाळचे पुणे । दि. बा. मोकाशी

# ज्योतिष्यांचे जग

पुण्यात असे एक ठिकाण आहे की, जिथे विश्वाचा विचार करणे हा रोजचा खेळ आहे. सम्राट असो किंवा शिपाई असो. त्यांच्या लेखी दोघेही सारखेच असतात. भूकंप, वादळे, दुष्काळ याबद्दल ते अगदी शांत अवस्थेत विचार करतात. राज्यक्रांत्याबद्दल त्यांना काहीच वाटत नाही. जन्म, मृत्यू, श्रीमंत, गरीब, निरोगीपण आजार, यश-अपयश, काहीही त्यांच्या विचारातून सुटत नाही. प्रभुरामचंद्रांपासून सर्वांच्या आयुष्याची इथे चिकित्सा होते. कुणाची भीती बाळगली जात नाही.

हे ठिकाण म्हणजे, ज्योतिष विज्ञानमंडळ पुणे विद्यार्थिगृह, पुणे हे होय. पुणे विद्यार्थीगृहाचे कार्यवाह श्री. का. गं. सोनार यांच्या निरीक्षणाखाली हे मंडळ काम करते. या मंडळाचे वतीने प्रत्येक रविवारी सायंकाळी, विद्यार्थीगृहाच्या आवारात या मंडळातर्फे ज्योतिषातील एखाद्या विषयावर व्याख्यान आयोजित केलेले असते. पुण्यातील ख्यातनाम ज्योतिषी सर्वश्री वि. धों. गोरेशास्त्री, काकासाहेब अवचट, श्री. के. केळकर, ब. दा. भट अशी मंडळी ज्योतिषशास्त्राच्या अंगोपांगांवर तिथे व्याख्याने गुंफतात. व्याख्यानाचे विषय साधारणत: असे असतात, 'गुरूचे कर्केतील भ्रमण' 'नवांश कुंडलीचे महत्त्व' 'सिंहेतला शनि' 'दशापद्धति' विषयाची ही शीर्षके वाचून तुम्हाला काही बोध होणार नाही; पण व्याख्यानाला जाऊन बसल्यावर तुमच्या लक्षात येईल की, शीर्षके काही असोत, माणसाच्या सुखदुःखाचा विचार येथे चालू असतो. मग तो माणसाच्या राष्ट्रांचा असेल नाही तर राष्ट्रांतील माणसांचा असेल. इंग्लंडच्या पंतप्रधानपदी कोण येईल? भुट्टोला फाशी दिले जाईल का? इंदिरा गांधींचे पुढचे दिवस कसे जातील? यशवंतराव चव्हाण पुन्हा जनतेतले पहिले पद मिळवतील का? जनता पक्षाचे काय होईल? शनीचे सिंहेतले किंवा गुरूचे कर्केतले भ्रमण बाराही राशीतल्या लोकांना कसे जाईल? या गोष्टींचा उलगडा येथे केला जातो. थोडक्यात येथे जगाचे भवितव्य ठरते, म्हणाना.

मी ज्योतिष विज्ञान मंडळाच्या या व्याख्यानांना अधूनमधून जातो. पुष्कळांना हा मी वेळेचा अपव्यय करतो असे वाटेल. मला त्याची झेप आवडतेच, पण ज्योतिष हे उपयोगी शास्त्र आहे असेही मला वाटतं. बहुतेक सर्वांना आपल्या भविष्याचे कुतूहल असते. ज्योतिषाला कोण काय विचारायला येते हे सांगता येत नाही. काही वर्षांपूर्वी मी ऐकलं की, एका मोठ्या कवीने एका मोठ्या ज्योतिषाला, आपण मोटारी किती घेऊ व व बंगला केव्हा बांधू असं विचारलं. आता कवीचा आणि मोटारींचा काय संबंध? मी ठरवलं की, आपण केव्हा भविष्य विचारलंच तर आपल्या लिखाणाविषयी विचारू. पण विचारण्याचे धाडस होत नव्हतं. तेवढ्यात मला भविष्य पाहण्याचा एक तक्ता मिळाला. त्या तक्त्यावर आकडे व अक्षरे होती. कुठेही त्यावर सुपारी ठेवून तेथून ठराविक अंतरावरचे शब्द घेऊन वाक्य बनत असे व त्या वाक्यात तुमच्या प्रश्नाचे उत्तर येई. हा तक्ता घरी आणून अगदी एकांतात, मनात खवखवत असलेला प्रश्न मी विचारला व सुपारी ठेवली. माझा प्रश्न होता, 'मला नोबल प्राईझ मिळेल का?' तक्त्याने माझ्या प्रश्नाचे उत्तर असे दिले, 'वत्सा! भलती आशा करू नको. झेपेल तेवढेच मनात आण. यश मिळेल.'

ज्योतिषाचा उपयोग आहे असे मी म्हटले. माणसाला नम्रता शिकवायला त्याचा उपयोग आहे हे लक्षात आलेच असेल. दुसरे एक उदाहरण देतो. एका गृहस्थावर पैसे खाल्ल्याचे व एका मृत्यूला कारण होण्याचे आरोप ठेवण्यात आले. त्या गृहस्थाची झोप उडाली, अन्न तुटले, केस पांढरे होऊ लागले. पाय लटपटू लागले. तो एका ज्योतिषाकडे गेला. ज्योतिषाने या आरोपांतून सुटशील. लढा दे. सहा महिन्यांनी या आरोपांतून तुझी मुक्तता होईल! भविष्य ऐकताच हा गृहस्थ नव जवानाच्या पावलांनी जोरांत परत गेला. त्याने लढा दिला व खटला जिंकला. मनाला उभारी आणण्यास ज्योतिषशास्त्र उपयोगी पडते हे काही कमी नाही. लेखकांना तर हे शास्त्र विशेष उपयोगी आहे. माणसाच्या स्वभावाचे बारकावे व आयुष्यातील प्रसंगांची विविधता याचे ज्ञान या शास्त्राइतके कुठेच मिळणार नाही.

□

ज्योतिष विज्ञान मंडळात अंतरा-अंतराने झालेल्या तीन व्याख्यानांचा उल्लेख मी आता करणार आहे. या तीनही विषयांत सर्वांना रस वाटेल अशी माझी खात्री आहे. त्यापैकी अगदी ताजे व्याख्यान दि. २९-६-७९ ला संध्याकाळी गोरेशास्त्री यांनी दिले. विषय होता. भृगुसंहिता व नाडीग्रंथ. या ग्रंथाविषयी ठिकठिकाणी लिहून आले असल्याने सर्वांना त्याची कल्पना असेल. हे ग्रंथ फार प्राचीन आहेत व त्यातले भविष्य अचूक असते अशी त्याची महती आहे. गोरेशास्त्री यांनी या समजुतीला टोला दिला. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे दीडशे वर्षांपूर्वीच्या कुंडल्या या ग्रंथात सापडणार नाहीत. हे ग्रंथ जुने असते तर वराहमिहिर वगैरेच्या ग्रंथात त्यांचा उल्लेख असता, पण तसा कुठेही नाही. यांत सहासष्ट वर्षांपुढच्या कुंडल्या आहेत. यांची भाषा अशुद्ध आहे, नकळेल इतकी. यांत झालेले सांगितलेले असते. पुढचे काही नसते. कुमारस्वामी नावाचा एक माणूस अशाच संहितेवरून भविष्य सांगावयाचा. पुढे तो पळून गेला तेव्हा जिथे तो उतरला होता त्यांनी कुमारस्वामीची संहितेची पोथी उघडून पाहिली. तो महाभारताचा ग्रंथ होता व त्यात पाहून तो भविष्य सांगावयाचा. गोरेशास्त्री यांचे म्हणणे असे की ज्योतिषाकडे गेले की आपण खूप बोलतो व माहिती सांगून टाकतो. तसे करू नका—गप्प बसा व त्याला बोलू द्या.

यावरून मला एक आठवण आली. आमचे

पृष्ठ २० वर

# इंदिरा काँग्रेस

## अरस यांचे आव्हान

वा. दा. रानडे

काँग्रेसमध्ये फूट पाडून आपली पूर्ण पकड असलेला इंदिरा काँग्रेस पक्ष इंदिरा गांधींनी १ जानेवारी १९७८ ला स्थापन केला; पण आता दीड वर्षानें तो आपल्या पूर्ण पकडीखाली राहील की, नाही अशी चिंता कर्नाटकचे मुख्यमंत्री देवराज अरस यांच्या आव्हानाने त्यांना वाटू लागली आहे. हे आव्हान मोडून काढून पक्षावर आपली अप्रतिहत सत्ता निर्विवादपणे प्रस्थापित करण्याकडे त्यांनी आपले सारे सामर्थ्य सध्या पणास लावले आहे. अरसविरुद्ध फौजफाटा संघटित करण्यासाठी गेल्या मेमध्ये आणि जूनमध्ये असा दोन वेळा त्यांनी कर्नाटकचा दौरा केला व नंतर जुलैलाही जाणार होत्या; पण तो त्यांनी पुढे ढकलला आहे.

वास्तविक अरस यांनी प्रथम इंदिरा गांधींच्या नेतृत्वास आव्हान दिलेले नव्हते. त्यांचा विरोध होता ती संजय गांधींच्या राजकारणप्रवेशास. दिल्लीस २२ एप्रिलला झालेल्या इंदिरा काँग्रेस अखिल भारतीय समितीच्या बैठकीत हा विरोध अरस यांनी प्रथम उघडपणे बोलून दाखविला. इंदिरा-अरस संघर्षाला सुरुवात या वेळेपासून झाली. इंदिरा गांधी फार संशयी आहेत. संजयचे निमित्त करून आपल्या नेतृत्वालाच अरस आव्हान देत आहेत असे त्यांना वाटले. एकदा एखाद्या सहकाऱ्याबद्दल संशय आला की, इंदिरा गांधी तो कायमचा मनात ठेवून वागतात हा अनुभव यशवंतराव चव्हाणांच्या बाबतीत आलेला आहे. अरस यांच्याशीही त्यांची वागणूक तशीच आहे.

अरस एकटे नाहीत. इतर राज्यांतही त्यांच्या भूमिकेस पाठिंबा मिळण्याचा संभव आहे. पश्चिम बंगालमध्ये या महिनाअखेर संजयच्या नेतृत्वाखाली मेळावा भरावयाचा आहे. त्याला प्रदेश काँग्रेसच्या कार्यकारिणीचे बहुसंख्य सभासदांनी विरोध दर्शविला आहे. केरळमधील पोटनिवडणुकांत इंदिरा काँग्रेसचा पराभव झाला. पक्षाच्या धोरणाचा फेर-विचार करायला हवा असे मत तेथे व्यक्त करण्यात येत आहे. आंध्र प्रदेश, महाराष्ट्र, पंजाब, तामिळनाडू येथेही एक गट अरस यांच्या पाठिंब्याची भूमिका घेणारे गट आहेत. आंध्रमध्ये वेंगलराव आणि विदर्भा-तील इंदिरा काँग्रेसचे नेते नाशिकराव तिरपुडे यांनी अरस यांच्या भूमिकेस पाठिंबा दिला हे सूचक आहे. प्रत्येक राज्यात असे गट संघटित झाले आणि पक्षात त्यांचे बहुमत झाले तर ते पक्षाला संजयविरोधी भूमिका घ्यावयास लावतील आणि संजय-विरोधाला यश आल्यास त्यानंतर इंदिरा-विरोधाचीही भूमिका हा गट घेण्याची शक्यता आहे. आपल्या नेतृत्वास असलेले हे आव्हान आताच मोडून काढायला हवे अशा निर्धाराने इंदिरा गांधींनी हालचाली सुरू केल्या.

अरस यांनी घेतलेल्या एकेक पवित्र्याने त्यांचा इंदिरा गांधींशी संघर्ष वाढतच गेला. खास न्यायालयांच्या विधेयकास विरोध दर्शविण्यासाठी १६ मेस दिल्लीला एक विराट मेळावा भरविण्याचे इंदिरा काँग्रेसने ठरविले आणि या मेळाव्यासाठी आपली मोठी पथके पाठवा असे आदेश राज्यशाखां-कडे गेले. याबाबत निर्णय घेण्यासाठी कर्नाटक प्रदेश इंदिरा काँग्रेस आणि विधिमंडळ इंदिरा काँग्रेस पक्ष यांच्या कार्यकारिणीची संयुक्त बैठक झाली. मेळाव्यात मंत्र्यांनी व आम-दारांनी भाग घेणे उचित ठरणार नाही असा निर्णय घेण्यात आला. इंदिरा गांधींचा अरस यांच्यावर रोष होण्याचे हे दुसरे कारण. 'या निर्णयामुळे आम्हाला दिल्लीच्या मेळाव्यास मोठा वजनदार जथा पाठविता येणार नाही' अशा शब्दात इंदिरा समर्थक खासदार जाफर शेरीफ यांनी या निर्णया-बद्दलची नापसंती बैठकीतच व्यक्त केली. मुख्यमंत्रिपद आणि इंदिरा काँग्रेसचे अध्यक्ष-पद ही दोन्ही पदे अरस यांनी आपल्याकडेच ठेवण्यासही त्यांनी विरोध दर्शविला. कर्नाटकातील इंदिरा काँग्रेसची सूत्रे आपल्या नियंत्रणाखालील गटाकडे आणण्याच्या हाल-चाली इंदिरा गांधींनी तेव्हापासून सुरू केल्या.

त्यांनी मेमध्ये कर्नाटकला तीन दिवसांची भेट दिली. त्यांचा कार्यक्रम ठरविण्याबाबत शेरीफ गट आणि अरस गट यांच्यात मतभेद झाले. अकरा मेस पक्षाच्या आमदार–खास-दारांशी अडीच तास चर्चेचा कार्यक्रम शेरीफ यांनी योजला होता त्याप्रमाणे तो झाला; पण उपस्थिती फार थोडी होती. हा कार्यक्रम आम्ही ठरविला नाही, त्याची जबाबदारी आमच्यावर नाही असे अरस गटाने उघडपणे सांगितले. अरस यांच्या या धोरणामुळे त्यांच्यावरचा इंदिरा गांधींचा रोष आणखी वाढला. अरस गटाच्या काही मंडळींनी त्यांची भेट घेतली तेव्हा अरस गटाच्या हालचाली पक्षाला पोषक नाहीत, अशी टीका इंदिरा गांधींनी केली. त्यानंतर जून-मध्ये त्यांनी कर्नाटकला दुसऱ्यांदा भेट देऊन आपल्या गटाचा फौजफाटा आणखी वाढ-विण्याचा प्रयत्न केला आणि अरस गट आपण यशस्वीपणे फोडू शकू अशी आश्वासने त्यांच्या समर्थकांनी दिल्यानंतर दिल्लीस १५ जूनला काँग्रेस-कार्यकारिणीच्या बैठकीत अरस गटाचे प्रभुत्व असलेली प्रदेशसमिती बरखास्त केल्याचा आणि अस्थायी समिती नेमल्याचा निर्णय जाहीर झाला.

अस्थायी समितीचे अध्यक्ष बंगटप्पा अरस यांच्या मंत्रिमंडळातच मंत्री होते. काँग्रेस-कार्यकारिणीचा निर्णय समजताच अरस यांनी आजारी असताही रात्री अडीच वाजता आपल्या सचिवांना बोलावून घेऊन बंगटप्पा यांना मंत्रिमंडळातून बडतर्फ करण्याची शिफारस राज्यपालांना करण्याचा निर्णय घेतला. पक्षसंघटनेवर तुम्ही कबजा मिळवि-णार असाल तर मंत्रिमंडळात तुमच्या माण-सांना आम्ही राहू देणार नाही हा इशाराच आपल्या या कृतीने अरस यांनी इंदिरा गांधींना दिला.

अरस यांच्या संजयविरोधापेक्षाही जनता पक्षनेत्यांच्या त्यांनी घेतलेल्या गाठीभेटी हे इंदिरा गांधींचा त्यांच्याशी संघर्ष वाढण्याचे अधिक महत्त्वाचे कारण होते. जनता पक्षास तीव्र विरोध ही तर इंदिरा गांधींची आज मुख्य भूमिका आहे. तेव्हा अरस यांचे हे पवित्रे त्यांना मान्य होणे शक्य नव्हते. या दोन्ही नेत्यांतील संघर्ष आता सांधण्यापली-कडे गेला आहे.

इंदिरा गांधींनी नेमलेली अस्थायी समिती मानण्याचे अरस यांनी नाकारले आहे. अरस

स्वतः तर या समितीवर काम करणार नाहीतच; पण आणखी दोघांनीही सभासद होण्याचे नाकारले आहे. प्रदेश काँग्रेस विसर्जित केल्याचा निर्णयही अरस यांना मान्य नाही. कारणे दाखवा नोटिशीस पाठविलेल्या उत्तरात त्यांनी इंदिरा गांधींच्या हुकुमशाहीवर कडाडून हल्ला केला आहे. आपल्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई होणार याची त्यांना पूर्ण कल्पना होतीच. त्याची वाट न पाहताच समविचारी काँग्रेसजनांचा राष्ट्रीय मेळावा ४ जुलैस बोलावण्याचा निर्णय अरस यांनी शनिवारी पत्रकारपरिषदेत जाहीर केला.

इंदिरा गांधींच्या हुकुमशाही कार्यपद्धतीविरुद्ध अरस यांचा लढा आहे. जनतानेत्यांनी त्यांच्या भूमिकेचे स्वागत केले आहे; पण अरस यांना खरोखरच स्वच्छ कारभार आणि लोकशाही कार्यपद्धतीबद्दल प्रेम आहे का? सबंध वर्षात प्रदेशकाँग्रसची बैठक त्यांनी एकदाही का बोलावली नाही? जनता पक्षाशी ते आताच सूत का जमवीत आहेत? ग्रोव्हर कमिशन अहवालानुसार होणाऱ्या कारवाईतून बचावण्याचा उद्देश यामागे आहे काय? अरस याच्या बंडामुळे इंदिरा काँग्रेस कमकुवत होत आहे, यामुळे जनता पक्षाला समाधान वाटावे हे स्वाभाविक आहे; पण ग्रोव्हर कमिशन अहवालानुसार आवश्यक कारवाई झालीच पाहिजे. अरस जनता पक्षाशी जवळीक साधू लागले म्हणून या कारवाईतून ते वाचणार नाहीत अशी जनतानेत्यांनी त्यांना स्पष्ट कल्पना द्यावयास हवी. अरस यांचे बंड म्हणजे इंदिरा काँग्रेसला मोठा हादरा व आव्हान आहे. त्याचे परिणाम इतर राज्यांतील इंदिरा काँग्रेसवर होणे अटळ आहे. इंदिरा काँग्रेस एक प्रभावी पर्यायी शक्ती म्हणून पुढे येण्याची शक्यता त्यामुळे दुरावली आहे. लोकशाहीच्या भवितव्याच्या दृष्टीने ही घटना स्वागतार्हच आहे; पण जनता पक्षनेत्यांनी आत्मसंतुष्ट राहून सध्याची भांडणे अशीच चालू ठेवली तर इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखाली हुकुमशाहीप्रवृत्ती पुनः डोके वर काढील. हा धोका लोकशाहीवाद्यांनी विसरून चालणार नाही.

पण दुर्दैवाने जनता पक्षनेत्यांना याची जाणीव दिसत नाही. त्यांचे आपसातील संघर्ष वाढतच आहेत. हरियानाच्या प्रश्नावर पक्ष नजीकच्या काळातच फुटणार काय असे वाटू लागले आहे. मुख्यमंत्री देवीलाल यांनी राजीनामा दिला; पण नव्या नेत्याला ते स्थैर्य लाभू देतील असे वाटत नाही. चरणसिंग उघड बोलले नसले तरी आपल्या भालोदगटासह पक्षाबाहेर पडण्याचीच तयारी त्यांनी केलेली दिसते, राजनारायण यांनी राजिनामा देऊन नवा जनता पक्ष स्थापण्याची घोषणाही केली आहे. अरस–इंदिरा संघर्षामुळे इंदिरा काँग्रेस फुटली आहे तर हरियाना प्रश्नावर जनता पक्ष फुटत आहे. राजकीय शक्तींची फेरमांडणी सुरू झालेली आहे. अरस यांच्या नेतृत्वाखाली संघटित होणाऱ्या काँग्रेसजनांबरोबर आघाडी करून पंतप्रधान मोरारजीभाईंना शह देण्याच्या आणि पंतप्रधानपद मिळविण्याच्या आकांक्षेने चरणसिंगांची पावले पडण्याची शक्यता आहे.

जनता पक्ष सुधारणे, एकसंध करणे आणि आपसातील भांडणे थांबवून कार्यक्रमावर लक्ष केंद्रित करणे कितपत शक्य आहे याचा एकदाच ठाम निर्णय घ्यावयास हवा. येत्या सहा महिन्यात त्यासाठी निर्धाराने प्रयत्न करायला हवेत. सहा महिन्यांत हे जमले नाही तर इंदिरा गांधींच्या हुकुमशाहीविरुद्ध लढा देण्यासाठी जनतेने उभारलेले हे हत्यार निकामी झाले असे समजून लोकशाही आणि समाजवाद यावर निष्ठा असलेल्या नव्या पर्यायी शक्तीच्या उभारणीस लागायला हवे. तसे न केल्यास सध्याच्या अस्थिर व गोंधळाच्या परिस्थितीतून हुकुमशाही प्रवृत्ती पुनः डोके वर काढतील. इंदिराप्रभाव अजून संपलेला नाही हे महाराष्ट्रातील जिल्हा परिषद निवडणुका आणि पुणे महापालिका निवडणुकांच्या निकालांनी दाखवून दिलेच आहे.


## ग्रंथालयात नवीन दाखल झालेली पुस्तके

१. अनन्तिका– ( आठवणी ) – अनंत काणेकर — रु. १७–५०
२. प्रसाधना– ( सौंदर्यप्रसाधनाविषयी ) – सिंधू डोंक्स — ,, २५–००
३. विळखा– ( कादंबरी ) – ग. वा. बेहेरे — ,, १०–००
४. दलित साहित्य : वेदना व विद्रोह – भालचंद्र फडके — ,, १५–००
५. सोनकी– ( आदिवासी जीवनावरील कादंबरी ) – र. वा. दिघे — ,, १५।–
६. क्रान्तिवीर बाबाराव सावरकर– (चरित्र) द. ना. गोखले — ,, ३०।–
७. बाबासाहेब पुरंदरे यांची शिवचरित कथनमाला– ( संकलक– गजानन शं. खोले ) – — ,, ३०।–
८. शवासनातून आत्मविकास– डॉ. संप्रसाद विनोद– — ,, २०।–
९. सेतुबंधन– (श्रीरामचंद्रांच्या जीवनावरील कादंबरी) – भा. द. खेर — ,, २१।–
१०. साठवणी– ( आठवणी ) – रा. भि. जोशी — ,, ३०।–

ENGLISH

11. **Hinduism**– Nirad C. Chaudhari — ,, 80/–
12. **The Male Menopause**– Derek Bowskill and Anthea Linacre — ,, 13–60
13. **Temple of The Stars**–(Cosomology) Brinsley Le Poer Trench
14. **The World According to Garp**– (Bestseller Novel) John Irving — ,, 22/–
15. **Not A Penny More, Not A Penny Less**– ( A motion picture Story ) – Jeffrey Archer — ,, 14–95

We buy regularly Popular Electronics, Popular Science, Popular Mechanics, Scienee Digest & other standard magazines.

**दि फिनिक्स लायब्ररी, ७२७ सदाशिव पेठ, पुणे ३०**

# लोकतांत्रिक नेपाळ ही काळाची गरज आहे

## विश्वेश्वर प्रसाद कोईराला यांची मुलाखत

विनय सहस्रबुद्धे

लोकशाही राजवटीच्या दिशेने वेगाने प्रवास करणारे भारतीय उपखंडातील आणखी एक राष्ट्र म्हणून नेपाळ उदयाला येत आहे. गेल्या महिन्यातच नेपाळचे राजे वीरेंद्रवीर विक्रम शाह यांनी सध्या अस्तित्वात असलेली पक्षविहीन पंचायतपद्धती आणि बहुपक्षीय लोकशाही पद्धती यातून एकाची निवड करण्यासाठी सार्वमत घेण्याची घोषणा करून लोकशाही आणण्याच्या प्रक्रियेस गती दिली आहे. १९६० नंतर नेपाळात आलेली राजे महेंद्र यांची जुलमी दमनकारी राजवट व या काळात थेट १९७६ पर्यंत नेपाळातील राजकीय पक्षांवर लादलेले निर्बंध या पार्श्वभूमीवर राजे वीरेंद्र यांचा निर्णय क्रांतिकारी समजला जातो. लोकशाहीच्या पुनस्थापनेची ही प्रक्रिया शेवटास जाऊन लोकशाही सरकार येण्यापर्यंतच्या काळात व त्यानंतरही नेपाळी जनतेच्या नेतृत्वाची सूत्रे माजी पंतप्रधान श्री. बिश्वेश्वर प्रसाद कोईराला यांच्याचकडे राहण्याची दाट शक्यता आहे. नेपाळातील लोकशाहीचे उद्गाते ठरतील असे श्री. कोईराला गेल्याच आठवड्यात मुंबईत आले होते. जसलोक इस्पितळातील वैद्यकीय उपचारानंतर दोन दिवस विश्रांतीसाठी ते मुंबईत थांबले होते. नेपाळातील लोकशाहीवाद्यांची मोहीम, तिचे बळ, राजे वीरेंद्र यांची नेमकी भूमिका, राजा विरुद्ध प्रजा या संघर्षाची आत्तापर्यंतची वाटचाल आणि श्री. कोईराला यांच्या स्वप्नातील 'उद्याचा नेपाळ' इ. वर प्रकाश टाकणारी, श्री. कोईराला यांच्या मुंबई वास्तव्यात घेतलेली ही त्यांची मुलाखत.

**प्रश्न :** कोईरालाजी, १९६० नंतर बरीच वर्षे भूमिगत स्वरूपात आणि आता सार्वमताची घोषणा झाल्यानंतर उघडपणे जी मोहीम आपण चालवीत आहात, तिचे नेमके अंतिम उद्दिष्ट काय आहे ? आपण जी लोकशाही राजवट अपेक्षिता तिची नेपाळातील नेमकी कोणती रचना आपणास अभिप्रेत आहे ?

**उत्तर :** लोकशाहीची पुनस्स्थापना हे आमच्या मोहिमेचे प्राथमिक ध्येय आहे. वेगळ्या शब्दात सांगायचे तर ते आमचे निखळ राजकीय ध्येय आहे. अर्थात लोकशाही हवी याचा अर्थ आम्हाला राजसिंहासन उखडून टाकायचे आहे असा नाही. सध्या राजा आणि प्रजा यांच्यामध्ये एक फार मोठी दरी आहे. राजेशाहीचे अंमलदार आणि सामान्य जनता यांच्यात Rapport आज राहिलेला नाही. परिणामत: सध्याची राजवट ही लोकप्रिय राजवट नाही. बहुपक्षीय लोकशाहीत लोकांना मतदानाद्वारे लोकप्रिय सरकार निवडण्याचा अधिकार मिळेल व आम्हाला अभिप्रेत असलेल्या लोकतंत्राची स्थापना होऊ शकेल.

माझ्या मते लोकशाही नुसती स्थापन करण्यातच नव्हे तर ती टिकविण्यात व रुजविण्यातही राजसिंहासन फार मोठी कामगिरी बजावू शकेल. राजेशाहीबद्दल लोकांना चीड आहे; पण राजाबद्दलचा आदर व निष्ठा लोकांमध्ये अद्यापही दिसून येते. या निष्ठेच्या व आदराच्या आधारेच नेपाळचे महाराज लोकशाही रुजविण्यास मदत करू शकतील. आज ब्रिटनमध्ये ज्या प्रकारची लोकशाही आहे. तशीच लोकशाहीची रचना आम्हाला अभिप्रेत आहे. तिकडे राणीचे जे स्थान आहे तेच आमच्या राजाचेही असावे असे आम्हास वाटते. प्रजातंत्र आणण्याच्या कामी राजा हेही एक माध्यम होऊ शकेल असे म्हणूनच मला वाटते.

**प्रश्न :** आपल्या महाराजांनी सार्वमत घेण्याची घोषणा केली आहे; पण अद्याप सार्वमताचा निश्चित दिनांक इ. तपशील जाहीर केलेला नाही. अशी सगळी अनिश्चित परिस्थिती असतानाही राजे वीरेंद्र जाहीर केल्याप्रमाणे खरोखरच सार्वमताचा निर्णय मानतील असा विश्वास आपणास वाटतो का ? वाटत असल्यास तो कशाच्या आधारावर ?

**उत्तर :** अलीकडील काही वर्षांत राजांनी उचललेल्या पाउलांचा अभ्यास केला तर हे लक्षात येईल की प्रत्यक्ष देशातील जनतेचे, जनतेच्या चळवळीचे, त्याचबरोबर जिथे अनिर्बंध राजसत्ता होती अशा जगातील इतर देशांतील बदलत्या मतप्रवाहाचे एक प्रकारचे दडपण राजावर आले आहे व सार्वमताची घोषणा ही त्याचीच परिणती आहे. भुत्तोच्या फाशीविरुद्ध नेपाळी विद्यार्थ्यांनी केलेली उग्र निदर्शने व ती दडपण्याचा सरकारचा प्रयत्न यातून राजसत्ते-विरुद्धचा संताप संघटित होण्यास एक निमित्त मिळाले. परिणामत: सार्वमताची घोषणा करून राजाला लोकभावनेला प्रतिसाद द्यावा लागला. आता, या घडीला राजा अशा एका मोक्याच्या ठिकाणी येऊन पोहोचला आहे की तिथून त्याला परत फिरणे कठीण आहे.

पृष्ठ १८ वर

बिंदुकथा

# भयात्कार

विंदुसार

महानगराचा सर्वात शोभिवंत विभाग रम्य उद्याने–निळेकाळे नितळ रस्ते–त्यांच्या दुतर्फा मंदपणे डुलणारी झाडे–पिवळ्या, लाल फुलांनी डवरलेली–नुकताच पाऊस पडून गेला आहे. सतत भासणारा उष्मा किंचित उणावला आहे.

इथल्या शाळा–कॉलेजांच्या गर्दीतल्या एका शाळेत, दहावीच्या वर्गात लीना बसली आहे. शेवटचा पीरियड चालू आहे.

लीना प्रयत्नपूर्वक समोरच्या फळ्याकडे लक्ष देत आहे; पण ती अस्वस्थ आहे. तिचे डोळे वर्गाच्या खिडकीबाहेर वारंवार वळत आहेत. शाळेच्या कंपौंडच्या लगत रस्त्यावर दोन माणसे सायकली हातात धरून उभी आहेत. दोन स्कूटरवर बसली आहेत. नक्की आठवत नाही; पण लीनाला वाटते की, ही माणसे कालही त्याच ठिकाणी रेंगाळत होती. वर्गात बाई घसा फोडून कुठली तरी कविता शिकवत आहेत. लीनाला त्यांचे शब्द तुटक तुटक जाणवतात.

ती मनगटावरच्या घड्याळाकडे नजर टाकते. बारा वाजायला आले आहेत. दहा मिनिटांत शाळा सुटणार.

टोले पडतात. वर्गात एकदम कपड्यांची, कागदांची सळसळ होते. बाई हातातले पुस्तक मिटवून वर्गाबाहेर निघतात. लीना बाकावरून उठते. बसून बसून चुरगळलेला स्कर्ट पाठीमागे हात फिरवून सारखा करते. निळसर ओव्हरऑल, दोन्ही पट्टे ओढून ठाकठीक करते. जाडजूड दप्तर खांद्यावर पेलीत ती बाहेर पडते. इतका वेळ दिसणाऱ्या त्या चार माणसांकडे कटाक्षाने दुर्लक्ष करून सायकलस्टँडकडे जाते.

पायी चालणाऱ्या, सायकलवरून जाणाऱ्या मुलामुलींच्या गर्दीतून लीना रस्त्यावर येते. सायकलवर बसून पॅडल मारू लागते. काही अंतर गेल्यावर तिचे बाजूला लक्ष जाते. एक सायकलवाला तिच्या जवळून चालला आहे तिच्याकडे लक्ष नाही असे दाखवीत.

लीनाचा अस्वस्थपणा वाढतो. ती कपाळावर हात फिरवते. घाम जमू लागला आहे. छातीची धडधड किंचित वाढली आहे. थोडे पुढे गेल्यावर उजव्या हाताला आणखी एक सायकलवाला दिसतो. जवळून चालला आहे.

आता दोघेही सायकलवाले डाव्या उजव्या हाताना अगदी खेटून चालले आहेत. लीनाचे पाय जड झाले आहेत. पॅडल्स जोरात फिरत नाहीत. पायांपासून डोक्यापर्यंत एक थंडगार शिरशिरी सरकत जाते. भीतीने लीनाला घेरले आहे; पण ही भीती नेहमीची नव्हे. लहानपणी अंधारात जाताना वाटायची ती ही नव्हे. दाढीवाल्याला पाहून वाटायची ती ही नव्हे. आईबाबा रागावले की वाटायची ती ही भीती नाही.

या भीतीत काही तरी वेगळे मिसळले आहे. शरीराच्या आतून, खूप खोलवरून ही भीती निघाली आहे. त्या भीतीची वर्तुळे शरीरभर फिरत आहेत.

स्कर्टच्या आत, मांड्यांच्या मधोमध ओलसरपणा जाणवतो आहे. नाडी सैल वाटू लागली आहे. छाती कोणी तरी आवळल्यासारखे लीनाला वाटते, ती मान खाली घालून पॅडल मारते आहे. वरच्या ओठावर पाण्याचे थेंब तरारले आहेत.

समोरच्या लांबलचक रस्त्यावर काही चाहूल नाही. तेवढ्यात एक स्कूटर लीनाच्या सायकलच्या अगदी पुढे येते व सावकाश चालत रहाते. अगदी सावकाश !

डाव्या बाजूचा सायकलवाला आणखी जवळ येऊन, दबल्या पण करड्या आवाजात बोलतो.

'हमारे साथ साथ चलते रहना–वरना' तो हसल्यासारखे ओठ दुमडतो.

दुसऱ्या बाजूचा सायकलवाला मगरूरपणे बजावतो.

'गीता–संजय जैसा तुम्हारा मर्डर कर देंगे ! ' चुपचाप चलो ! '

पुढे स्कूटर, दोन्ही बाजूंना दोन सायकलवाले यांच्यात लीना पूर्णपणे अडकली आहे. मघापासून शाळेत वाटणारी अस्वस्थता, नंतरची शारीरिक भीती आता लीनासमोर उघडयावाघड्या स्वरूपात उभी राहते.

कुठल्या तरी सिनेमात, गुड्घ्यात मान खुपसून ओझरते पाहिलेले दृश्य लीनाच्या दृष्टीसमोर तरळते. अंगावरचे कपडे फाटलेली, धावपळ करणारी बाई आणि तिच्यामागे सैरावैरा धावणारा बुवा. दोरीवर वाळत घातलेला लंगोट, उगाचच, पाहिल्याचे आठवते. शेजारच्या दीपकचे घोगरे बोलणे आणि निष्कारण लगट आठवते.

लीनाचे मस्तक आता बधिर झाले आहे. सर्व जाणीव, सर्व अस्तित्व सायकलच्या सीटपाशी दडलेल्या, शरीराच्या लहानशा भागापुरते मर्यादित झाले आहे.

अशा अवस्थेत किती वेळ पॅडल मारतेय ते लीनाला समजत नाही. मेन रोड आल्याचे अंधुक जाणवते. तिच्या घरी जाण्यासाठी तिला उजवीकडे वळले पाहिजे–पण तिघांच्या गराड्यांत तिला डावीकडे वळले पाहिजे.

आता रहदारी वाढली आहे. बसेस, मोटारी, सायकली–पण लीना ओरडू शकत नाही. डावीकडच्या सायकलवाल्याच्या हलक्या, जरबेच्या आवाजातील धमक्या किंबहुना त्याची नजर तिला ओरडू देत नाही. ती निर्जीवपणे सायकल चालवीत आहे. आतले सर्व कपडे घामाने चिंब झाले आहेत.

मेन रोडच्या पहिल्या चौकात सगळी मिरवणूक उजवीकडे वळते. तेथील पुलावरून आस्ते आस्ते मुख्य बाजारभागाकडे येते. येथे रहदारीचे मोठे इंटरसेक्शन आहे. वाहनांच्या गर्दीत स्कूटर थोडी बाजूस होते. अचानक अवसान घेऊन, दात-ओठ चावीत लीना सायकल पुढे दामटते. भयाने ती जवळ जवळ भानावर नाहीच. चौकातून पुढे गेल्यावर दिसेल त्या बाजूला ती सायकल वळवते. मागे ट्रॅफिकचा लाल दिवा लागला आहे. तिचे पहारेकरी अडकून पडले आहेत.

दिसेल त्या इमारतीत लीना घुसते सायकल तशीच रस्त्यावर टाकून. धावत धावत ती आत शिरते. मोठा कौंटर ओलांडून आत जाते.

तेथे टेबलावर फोन आहे. एक साहेब टेबलावरच्या कागदांत डोके घालून बसला आहे. तो दचकून वर पाहतो. त्याला कशीबशी फोन करण्याची परवानगी मागून लीना घाईघाईने नंबर फिरविते. एंगेज्ड !

पुन्हा लीना नंबर फिरविते. बोलू लागते. " कोण मम्मी–माझ्यामागे लोक आहेत. लौकर गाडी पाठव–लौकर " एवढे बोलता बोलता लीनाला रडू फुटते. ती ढसाढसा रडू लागते. फोन हातात तसाच ठेवून ! फोनमधून बाईचा आवाज जोरात येतोय– " अग–कुठे गाडी पाठवू ? लीना, कुठे आहेस तू ?

टेबलावरचा साहेब चक्रावून फोन हातात घेतो. पलीकडून सारखे प्रश्न येताहेत. साहेब ऑफिसचे नाव सांगतो. लीना चटकन फोन पुन्हा आपल्या हातात घेते. रडत रडत सांगते " मम्मी, आपली गाडी नको पाठवू. त्यांना कळेल ! पपांना टॅक्सीने यायला सांग–लौकर !' एवढे बोलून लीना खुर्चीत कोसळते ! पुढचे तिला काही माहिती नाही !

दुसऱ्या दिवशी सगळ्या पेपर्समध्ये पहिल्या पानावर बातमी येते–

" शाळकरी मुलीस पळविण्याचा भर दुपारी प्रयत्न. गीता-संजयसारखा खून करण्याची धमकी. शहरात भीतीचे वातावरण! "

महानगराचा सर्वात शोभिवंत विभाग–रम्य उद्याने–निळेकाळे नितळ रस्ते......

□

कुरुक्षेत्र केरळ । लेखांक चौथा

विनय हर्डीकर । सतीश कामत

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघ - मार्क्सवादी नजरेतून !

मार्क्सवादी कम्युनिस्ट आणि रा. स्व. संघ यांच्या पूर्वेतिहासाकडे वळण्यापूर्वी या प्रकरणी मार्क्सवाद्यांनी जो वृत्तपत्रीय प्रचाराचा धडाका लावला तो बघितला पाहिजे. संघाच्या कार्यकर्त्यांचा भर व्यक्तिगत संपर्कावर नेहमीच असतो, तर डाव्या चळवळीचा भर नेहमीच प्रसिद्धीची माध्यमे जोरात राबवण्यावर असतो. शिवाय मार्क्सवाद्यांच्या बाजूची दैनिके–साप्ताहिके केरळात अत्यंत दृढमूल झालेली आहेत तर संघाची बाजू मांडणारे 'केसरी' हे एकमेव साप्ताहिक असून 'जन्मभूमी' हे दैनिक अद्याप बाल्यावस्थेतच आहे. केरळातला 'केसरी' संघाच्या बाजूचा असावा ही एक गंमत– अहमदाबादचं 'साधना' नावाचं साप्ताहिकही संघाचंच आहे, ही दुसरी. मार्क्सवाद्यांनी निवडणुकीच्या निमित्ताने खुद्द तेलिचेरीत आणि इतरत्र केरळभर प्रचाराच्या तोफा जोरदारपणे उडवल्या त्या आता पाहायच्या आहेत.

आम्ही कोचीनला ज्या दिवशी पोचलो त्या दिवशी हवा ढगाळ होती. अधूनमधून पावसाच्या जोरदार सरीही येत होत्या. हा खास किनारपट्टीच्या प्रदेशातला पाऊस असल्यामुळे मिनिट-दोन मिनिटात पूर्णपणे भिजवून टाकत होता. कुठे तरी आसरा शोधे-पर्यंतच त्यातली निष्फलता लक्षात येऊ लागायची; पण हा पाऊस फार काळ टिकणारा नसल्याचं वेधशाळेतर्फे सांगण्यात आलं होतं. कारण तो केवळ आंध्र प्रदेशातील चक्री वादळाचा side–effect होता.

त्या दिवशी कोचीनमध्ये फारसं काहीच काम नव्हतं. तेलीचेरीला जायचं होतं; पण ती गाडी रात्री एक वाजता होती. त्यामुळे संध्याकाळी कोचीन विद्यापीठामधील एका प्राध्यापकांची भेट घेण्याचं ठरवलं. विद्यापीठातील फिजिक्स विभागाचे प्रमुख असलेल्या या प्राध्यापकांचं नाव होतं डॉ. सत्यानंदन. कोचीनला जाण्यापूर्वी डॉ. सत्यानंदन पुणे विद्यापीठात प्राध्यापक होते. पुण्याबद्दल त्यांना अतिशय प्रेम आहे आणि पुणे विद्यापीठामधले विद्यार्थीदेखील अद्याप त्यांच्या अध्यापनाच्या आठवणी काढत असतात. ते स्वतः मार्क्सवादी विचारसरणीचे पुरस्कर्ते आहेत. त्यामुळे साहजिकच त्यांच्याकडून केरळातील मार्क्सवादी चळवळीची काही तरी theoretical बाजू समजावून घेता येईल या अपेक्षेने गेलो. मार्क्सवादी परिभाषेत सत्यानंदन हे fellow travellers पैकी आहेत. शिवाय अनेक वर्षे पुण्यात घालवल्यामुळे केरळातील दैनंदिन राजकारणाशी त्यांचा परिचय नसणार याचीही कल्पना होतीच; पण एक सर्वसामान्य बुद्धिजीवी मार्क्सवादी म्हणून त्यांच्याकडून काही प्राथमिक माहिती मिळेल असा भरवसा होता.

कोचीन विद्यापीठाचे आवार खूपच मोठे आहे आणि सुंदरही. पुणे विद्यापीठाप्रमाणेच काही ठिकाणी नैसर्गिक सौंदर्य बऱ्याच प्रमाणावर टिकवून ठेवण्याचा प्रयत्न केलेला आहे. शिवाय एकूण आवाराच्या मानाने इमारती खूपच कमी आहेत. कारण हे विद्यापीठ स्थापन होऊन अवघी सात वर्षे झाली आहेत. प्रचंड चढउतार हे केरळातल्या अनेक भागांचे वैशिष्टच आहे. कोचीन विद्यापीठही त्याला अपवाद नाही. इथे हे नैसर्गिक चढउतार तसेच कायम ठेकले आहेत. फक्त त्यांचे डांबरीकरण केलेले आहे. त्यामुळे बऱ्याच वेळा पुणे विद्यापीठाच्याच आवारात भटकतो आहोत की काय असे वाटत होते.

डॉ. सत्यानंदन विद्यापीठात नव्हते. त्यांचे घरही विद्यापीठाच्या आवारात नाही. त्यामुळे विद्यापीठातून घरचा पत्ता घेऊन थोडेसे शोधत, एखादा अशिक्षित माणूस दिसला तर त्याला विचारत प्राध्यापकसाहेबांच्या घरी पोचलो.

प्राध्यापक म्हटल्यावर जी प्रतिमा आपल्यासमोर उभी राहते, त्याला डॉ. सत्यानंदन कोणत्याही प्रकारे अपवाद नव्हते. थोडेसे ठेंगणे, धारदार नाक, नाकावर चष्मा, केसांचा जवळजवळ मध्य-भागी पाडलेला भांग, फक्त टाय–कोटऐवजी लुंगी–कुडता अशा घरगुती पोशाखात प्राध्यापकसाहेब बाहेर आले. पुण्याहून आलो म्हणताच त्यांनी अतिशय मनापासून आमचे स्वागत केले. आदरातिथ्यही केले. प्रथम पुणे विद्यापीठाविषयी 'सुरस आणि चमत्कारिक' गप्पा झाल्या. केरळला त्यांच्याकडे जाण्याचा उद्देश सांगितल्यावर चर्चेला सुरुवात झाली.

### समाजवाद्यांचं नाकर्तेपण

सध्या मार्क्सवाद्यांना दुसरी युती करणे शक्य नसल्यामुळे ते जनता पक्षाशी संधान साधून आहेत.' असे सत्यानंदन यांनी सुरुवातीलाच सांगितले आणि पुढे अशीही पुस्ती जोडली की, 'फक्त निवडणुकीपुरतेच हे दोन पक्ष एकत्र येतील. कार्यक्रमाच्या पातळीवर नाही.'

डॉ. सत्यानंदन पुढे म्हणाले. 'आज समाजवादी फार धोकेबाज खेळ खेळत आहेत. समाजवादी नेत्यांनी त्यांच्या कार्यकर्त्यांना

नाराज केलेले आहे. खरे म्हणजे जातीयवादी शक्ती हे त्यांचं हल्ल्याचं मुख्य लक्ष्य असायला हवं; पण ते चुकीच्याच ठिकाणी चुकीच्या मुद्द्यांवर हल्ले करताहेत. थोडक्यात The wholc socialist movement has lost its control and dynamism. त्यामुळेच समाजवादी पक्षापेक्षा मार्क्सवादी पक्ष केरळात अधिक लोकप्रिय झाला; पण जनसंघाला केरळात बहुजन समाजाचा पाठिंबा आहे असे मात्र मला वाटत नाही. केरळमधील इंदिरावादी काँग्रेसही आज दुबळी नाही; पण त्याचबरोबर कर्नाटक किंवा आंध्र प्रदेशाप्रमाणे ती सबंध केरळ धुऊनही काढू शकणार नाही. (आम्ही हे १२ मे या दिवशी बोलत होतो. आज सगळेच रंग बदलले आहेत, रोज बदलत जाताहेत,) पण पाठिंब्यासाठी इंदिराजी अल्पसंख्यांकांकडेच जातील आणि त्यांना तो मिळेलही. केरळातील चळवळही चांगल्यापैकी परिपक्व झाली होती. इतर राज्यांमध्ये जाणवणारा विचारातला उथळपणा इथल्या नक्षलवादी चळवळीत नव्हता.'

## आंतरराष्ट्रीय बदल ?

केरळमधल्या राजकीय शक्तीचे पृथक्करण प्राध्यापकसाहेब करत होते. त्यातील बराचसा भाग वृत्तपत्रे किंवा ग्रंथवाचनावर आधारित असावा असे वाटत होते. शेवटी साहजिकच चर्चा आर. एस. एस. व मार्क्सवाद्यांमधील चकमकीवर आली; पण 'या चकमकी, हा संघर्ष संपूर्णतः स्थानिक पातळीवरचा आहे आणि तो स्थानिक पातळीवरच राहील,' असे सत्यानंदन यांनी ठामपणे सांगितले. तसेच चीन, रशिया आणि इतर डाव्या विचारसरणीचे देश एकत्र येऊन काही तरी 'आंतरराष्ट्रीय बदल' घडून गेण्याची शक्यताही, खरे म्हणजे इच्छाच प्राध्यापकमहाशयांनी शेवटी व्यक्त केली.

'देशाभिमानी' हे मार्क्सवाद्यांतर्फे चालविण्यात येणारे केरळातील एक महत्त्वाचे दैनिक आहे. कोचीनहून प्रसिद्ध होणाऱ्या या दैनिकाचा खप पन्नास हजारांहूनही जास्त आहे. या दैनिकाचे विद्यमान संपादक श्री. पी. गोविंदन पिले यांचीही कोचीनमध्ये भेट घेतली. केरळमधील मार्क्सवाद्यांच्या वरिष्ठ नेत्यांबरोबर श्री. पिले यांचा नेहमीच संबंध येतो. कारण श्री. गोविंद पिल्ले (मल्याळममधील उच्चार 'पिळळा' असा आहे) प्रथमपासूनच मार्क्सवादी पक्षाच्या महत्त्वाच्या कार्यकर्त्यांपैकी व brain trust पैकी आहेत. सध्या वृत्तपत्रांचे कामही ते पक्षाची गरज व तसा आदेश आहे म्हणूनच करतात. त्यांच्या कार्यालयात इ. एम्. एस्. आणि गोपालन यांचा एक फार चांगला हसतमुख असा फोटो लावलेला आहे. स्वतः पिल्ले आता पन्नाशीच्या पुढे गेले असावेत. सध्याच्या संघवाद्यांविरोधीच्या लढ्यात 'देशाभिमानी' या दैनिकानेही भाग घेतला होताच; म्हणून त्या विषयावर संपादकमहाशयांशी चर्चा केली.

केरळातील संघ आणि मार्क्सवादी यांच्यातील चकमकीसंबंधी बोलताना श्री. पिले यांनी सुरुवातीलाच हे स्पष्ट केलं की,–

'आमचा जरी धर्मावर विश्वास नसला तरी धर्मपालन करणाऱ्यांना मात्र आम्ही सतत पाठिंबा देत आलो आहोत, सहाय्यही केले आहे. फक्त ज्या वेळी हा दृष्टिकोन रोगट असेल तेव्हा आम्ही त्याला विरोध केलेला आहे. संघवाद्यांमध्ये आणि आमच्यामध्ये हा जो संघर्ष उभा राहिला तो त्यांची श्रद्धा आणि आमची नास्तिकता यामधून उभा राहिलेला नाही, तर जेव्हा ते संघाच्या प्रचारासाठी शाळा आणि देवळांचा वापर करायला लागले, ही ठिकाणं जेव्हा संघाची केंद्रं बनायला लागली तेव्हा आम्ही विरोध केला. तसेच ज्या ठिकाणी धार्मिक कर्मकांडावर पैसा उधळला जातोय, असे दिसले त्या ठिकाणी आम्ही विरोध केला. संघाच्या या कारवायांना मुख्यतः सरंजामशाही वृत्तीचे लोक, संस्थानिक आणि सवर्ण हिंदू यांचाच पाठिंबा आहे. कामगार आणि मुस्लीम हे दोघेही संघवाल्यांचे शत्रू आहेत; पण सध्या मुस्लिमांना दुखावण्याची त्यांची इच्छा नाही, म्हणून आमच्यावर हल्ले करतानासुद्धा त्यांनी मुस्लिम मार्क्सवाद्यांना मारले नाही.'

## संघाची अपरिपक्वता

या मुद्द्यावरूनच चर्चा तेलीचेरीमधील चकमकींवर आली. संघाने सहा वर्षांपूर्वीच पालघाट जिल्ह्यामध्ये एक तरुण मार्क्सिस्ट मुलगा मारला, विट्टप्पा नाईक नावाच्या माणसाला मार्क्सवादीपक्षात गेल्याबद्दल ठार मारले असे आरोपही श्री. पिले यांनी केले; पण या चकमकीबद्दल बोलताना ते म्हणाले की–

'यातून (अशा तऱ्हेच्या चकमकींमधून) काहीही फायदा होणार नाही, हे न कळण्याइतके आम्ही मूर्ख नाही. आमच्या पक्षाला एक इतिहास आहे, परंपरा आहे. राष्ट्रीय पातळीवरील या पक्षाने राज्ये चालवली आहेत, विरोधातही उभा राहिला आहे. तेव्हा आम्ही संघवाल्यांइतके राजकीयदृष्ट्या अपरिपक्व नाही. जनतापक्षाबरोबर युती केलेली असताना पक्षाच्या एका गटाबरोबर भांडणे उचित नाही, हेही आम्हाला समजतं. फक्त जेव्हा आमच्या निरुपद्रवी विडी–कामगारांवर हल्ले होतात, आमची माणसे मारली जातात तेव्हाच आम्ही प्रत्युत्तर केले आहे–तेसुद्धा सर्व ठिकाणी नाही. कारण आमचा तसा उद्देशच नाही. दहशतवाद निर्माण करणारी कृत्ये फार काही साधू शकत नाहीत उलट अशी कृत्ये करून संघवादी विस्तवाशीच खेळत आहेत. त्यांचे अस्तित्व दाखवण्याचा प्रयत्न करत आहेत. आमचीही लढायची तयारी आहे, पण स्वेच्छेने नाही!'

## लष्करी उठाव !

केरळमध्ये साक्षरतेचे प्रमाण चांगले असताना, मार्क्सवाद्यांची केरळच्या राजकारणावर एवढी पकड असताना, संघासारखी revivalist संघटना इथे मूळ धरू तरी कशी शकली, याचे उत्तर देताना संपादकमहाशय म्हणाले–

'ज्या ठिकाणी डावी विचारसरणी असते तिथेच Fascism चीही वाढ होते. म्हणूनच सगळ्यात तीव्र संघर्ष बंगाल आणि केरळातच आहे. केरळात देखील संघवाल्यांचं मुख्य धोरण नंबुद्रीपादविरोधी प्रचार हेच आहे; पण आम्ही जे काम केलेय त्यापैकी काहीही संघवाल्यांच्या भावी योजनेमध्ये देखील नाही. त्यामुळे त्यांनी हिंदुत्वाचा कितीही जरी प्रचार करायचा प्रयत्न केला तरी Nobody is going to accept Hinduism at the cost of wages. संघाचे केरळातले काम वरवरचे, केवळ दाखवण्यापुरते आहे. आम्ही जे काम केलं आहे किंवा करत आहोत तिथपर्यंत त्यांची उडी कधी जाऊच शकणार नाही. म्हणूनच मार्क्सवादी चळवळ केरळातच नव्हे, तर

शांतेत इतरत्रही चांगले मूळ धरू लागली आहे. आम्ही आमचे अखिल भारतीय अधिवेशन बनारसला घेतले, हेही याचेच निदर्शक आहे. अर्थात पुढे काय होईल, हे सांगता येत नाही; पण लष्करी उठावणीची शक्यताही नाकारता येत नाही. तेव्हा सर्व डाव्या आणि लोकशाहीवादी शक्तींनी एकत्र येणेच श्रेयस्कर आहे. इंदिरा काँग्रेसबद्दल म्हणाल तर आज केरळमध्ये तरी ते तिसऱ्या पायरीवर आहेत आणि इंदिराजीप्रमाणेच त्यांचा पक्षही उतरणीला लागला आहे. राष्ट्रीय पातळीवरील राजकारणातही गेली तीस वर्षे जे चालत होते ते आणि तसेच पुढे चालू आहे. म्हणूनच आम्ही एकत्र यण आवश्यक आहे. या संघवाल्यांच्या revivalist activities वर मात करून पुढे जाणे आवश्यक आहे.

## नरो वा कुंजरो वा

संपादकसाहेब हे सगळं बोलत होते तरी आम्ही विचारलेल्या प्रश्नाला त्यांनी थोडीशी बगलच दिल्यासारखं वाटलं म्हणून, 'केरळमध्ये हिंदू समाजामध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होऊ लागली होती, एक पोकळी निर्माण झाली होती. त्यामुळे संघासारख्या संघटनेला केरळमध्ये पाय रोवता आले असं आपल्याला वाटतं का?' असा प्रश्न आम्ही विचारला तेव्हा एकदम धर्मराजाचा आव आणून 'असेल, तसंही असेल. पोकळी असेलही, पोकळी नसेलही. केरळात संघ वाढण्याचं ते एक कारण असूही शकेल. तशी संघाची थोडीशी वाढ झाली आहे, हेही नाकारून चालणार नाही; पण अशा प्रवृत्तींना थारा देणारी माणसे प्रत्येकच समाजात असतात.' अशा प्रकारचं बोलणं चालू असताना श्री. पिल्ले आता काही फारशी माहिती सांगण्याच्या मनःस्थितीत नाहीत असं दिसायला लागलं. चर्चाही फारशी होईना. मग शेवटी त्यांना आणखी एक प्रश्न विचारलाच 'मार्क्सवाद्यांनी केरळात हिंसाचार पेरला तोच आता उगवला आहे आणि मार्क्सवाद्यांवर उलटला आहे' असं इतर पक्षांचे लोक सारखे म्हणतात, त्यावर तुमचं मत काय?' या प्रश्नावर त्यांनी एका अक्षराचं काही उत्तर दिलं नाही. मग आम्ही चर्चा काही theoretical मुद्दे, काही आंतरराष्ट्रीय घडामोडींवर जुजबी चर्चा केली आणि त्यांचा निरोप घेतला. अर्थात अडचणीत आल्यावर नेहमीच्या वर्गशत्रू, प्रतिक्रियावादी वगैरे शिव्या न देण्यातही त्यांनी बरीच परिपक्वता दाखवली हेही खरं!

निघता–निघताच पिलेसाहेबांनी People's Democracy या मार्क्सवादी साप्ताहिकाचा १३ मेचा अंक दाखवला. सुमारे बारा–साडेबारा हजार खप असलेल्या या साप्ताहिकामध्ये चौकशी समितीने दिलेल्या अहवालाचा काही भाग प्रसिद्ध करण्यात आला होता. १९७१ साली तेलीचेरीमध्येच एक हिंदु–मुसलमानांची दंगल उसळली होती. त्या दंगलीची कारणे शोधून काढण्यासाठी एक न्या. विठायथिल यांची एकसदस्य चौकशी समिती नेमली गेली होती. चौकशी समितीने जो अहवाल दिला होता तोच या १३ मेच्या अंकात छापण्यात आला होता. न्यायमूर्तिसाहेबांनी अहवालात म्हटलं होतं–

'तेलीचेरीमध्ये ज्या घटना घडल्या त्या उत्स्फूर्तपणे घडून आल्या नाहीत, तर अतिशय योजनापूर्वक त्यांची आखणी करण्यात आली होती हे लक्षात आल्यानंतर साहजिकच असा प्रश्न निर्माण होतो की, ही योजनाबद्ध आखणी कोणी केली आणि त्यानुसार कारवाईही कोणी केली?

'या दंगलीच्या पार्श्वभूमीबद्दल मी हे आधीच स्पष्ट केलं आहे की, केरळमधील राजकीय घडामोडी, सरकारी कार्यपद्धती आणि मुस्लिम लीग ही स्वतःच्या राजकीय शक्तीचा वापर करून स्थानिक पोलिसांना कह्यात ठेवत आहे आणि त्यामुळे हिंदूंवर अन्याय होत आहे अशी तेलीचेरीतील हिंदूंची सतत वाढत असलेली भावना या दंगलीला कारणीभूत आहे. त्याचप्रमाणे हिंदूंवर अत्याचार करणाऱ्या गुंडांना मुस्लिमलीगचे नेते प्रोत्साहन देत आहेत, अशीही तक्रार तेलीचेरीतील हिंदू समाजाकडून होत आहे.

'याच ठिकाणी हे स्पष्ट केलं पाहिजे की, तेलीचेरीतील राजकारणाचं असं एक वैशिष्ट्यच आहे की, या ठिकाणी हिंदु आणि मुस्लिमांमध्ये लहानशी चकमक जरी उडाली तरी त्याला जातीय दंगलीचं स्वरूप दिलं जातं. मुस्लिम लीग पोलिसव्यवस्थेमध्ये ढवळाढवळ करते हा आरोप संपूर्णपणे बिनबुडाचा आहे असं मी मानत नाही; पण त्याच वेळी या भागातील राजकीय गटांनी मुस्लिम लीगविरोधी प्रचार करून हिंदूंमध्ये मुस्लिमविरोधी भावना निर्माण करण्यात फार महत्त्वाचा वाटा उचलला आहे, हेही अमान्य करता येणार नाही.

'अशा तऱ्हेचं मुस्लिमविरोधी आणि मुस्लिम लीगविरोधी वातावरण निर्माण करण्यात राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि जनसंघ हे दोन गट सर्व राजकीय गटांमध्ये आघाडीवर आहेत. अर्थात सबंध भारतातच संघामध्ये जो मुस्लिमविरोधी दृष्टिकोन आहे त्याच्याशी हे सुसंगतच आहे. संघामध्ये मुस्लिमविरोधी भावना किती तीव्र आहेत हे जाणून घेण्यासाठी श्री. गोळवलकर यांचे 'Bunch of Thoughts' हे पुस्तक वाचलं तरी पुरेसं होईल. पुस्तकातील १७२ आणि १७३ पानांवर लेखक म्हणतो–

'मुस्लिम लीगने केरळमध्ये पुन्हा डोकं वर काढायला सुरुवात केली आहे. पाकिस्तानच्या निर्मितीमुळे उत्तर हिंदुस्तानातील लोक मुस्लिम लीगमुळे निर्माण होणाऱ्या धोक्यांबद्दल तूर्त तरी जागरूक आहेत. तेव्हा मुस्लिम लीगने असं म्हटलं की, त्यांनी त्यांचं कार्य गुप्तपणे चालूच ठेवलं होतं. १९५९ साली कम्युनिस्ट पार्टीला सत्तेवरून खाली खेचणारं जे जनआंदोलन केरळात उसळलं त्यामुळे तर लीगवाल्यांना उघडपणे समोर येण्याची सुवर्णसंधीच मिळाली. मुस्लिम लीगला चुचकारण्याचे काय परिणाम होतात. याबद्दलचं शहाणपण पूर्वानुभवावरून न शिकता काँग्रेसने या दगाबाज पक्षाला निवडणुकीसाठी मिठी मारली आणि या उघड उघड देशद्रोही कृतीचं समर्थन करण्यासाठी पंडित जवाहरलाल नेहरू यांनी जुनो मुस्लिम लीग आता राहिली नसून, स्वतःची जात आणि धर्म यांना वाहिलेला हा एक नवा देशप्रेमी पक्ष भारतात उदयाला येत असल्याचं प्रशस्तिपत्रकही देऊन टाकलं; पण नेहरूंच्या दुर्दैवाने अखिल भारतीय मुस्लिम लीगच्या अध्यक्षाने दुसऱ्याच दिवशी हे जाहीर करून टाकलं की, कोणत्याही बदलाची सावलीदेखील न पडलेली आमची मुस्लिम लीग जुनीच आहे. आता केरळमध्ये 'स्वतंत्र मोपला प्रदेशा'साठी ही मुस्लिम लीग उघडपणे प्रचार करीत आहे.

'या सर्व घडामोडींवरून पन्नास वर्षांपूर्वी भारतामध्ये जो परि-

स्थिती होती तीच परिस्थिती पुन्हा निर्माण होऊ लागली असल्याचं कोणाच्याही लक्षात येईल. १९२० च्या सुमारास, मुस्लिमांशी मैत्रीचे संबंध निर्माण करण्यासाठी हिंदूंनीही 'खिलाफत चळवळी'त भाग घ्यावा, असं आमच्या नेत्यांनी आवाहन केलं. केरळमध्ये कार्यकर्ते आणि पैशासह हिंदु समाज या चळवळीसाठी पुढे आला; पण ब्रिटिशविरोधी असलेला मुस्लिमांचा क्रोध अचानकपणे हिंदु 'काफिरां'विरुद्ध 'जिहाद' पुकारण्यात परिणत झाला आणि जाळपोळ, लुटालूट, खून-मारहाण, अत्याचार, सक्तीचं धर्मांतर अशा स्वरूपाचा खास 'मुस्लिम रानटीपणा' सुरू झाला. अंगावर शहारे आणणाऱ्या या घटना जेव्हा देशामध्ये इतरत्र पोचल्या तेव्हा एका प्रमुख नेत्याने 'शूर मोपला' म्हणून या मुस्लिमांचं कौतुक केलं. यांना 'देशभक्त' म्हणणाऱ्या सध्याच्या नेत्यांच्या शब्दांशी या शब्दांची तुलना केली म्हणजे देशामधील जागरूकता आणि सुरक्षितता नष्ट करणाऱ्या आत्मघातकी थंडपणाची कल्पना येईल!

मौलाना मोहम्मद अली यांच्याबद्दल पान १७७ वर श्री. गोळवलकर म्हणतात, 'स्वातंत्र्ययुद्धाच्या सुरुवातीच्या काळात महात्मा गांधींचे उजवा हात असलेल्या मौलाना मोहम्मद अली यांनी एकदा नव्हे अनेकदा असं जाहीरपणे सांगितलं होतं की, त्यांच्या मते मुस्लिमांमधील जास्तीत जास्त पापी असलेला मनुष्यसुद्धा महात्मा गांधींपेक्षा किती तरी पटींनी श्रेष्ठ आहे.'

'The Bunch of Thoughts' या पुस्तकाचं मल्याळी भाषेत भाषांतर केलेलं आहे. बी. पी. आबुबेकर (साक्षीदार) म्हणतात की, हे पुस्तक तेलीचेरीमध्ये फुकट वाटलं जात होतं. हिंदुसंरक्षक समितीचे चिटणीस आणि संघाचे प्रमुख कार्यकर्ते सी. चंद्रशेखरन् म्हणतात की, श्री. गोळवलकर हे आमच्या संघटनेचे तत्त्वज्ञ आणि मार्गदर्शक आहेत.

'तेलीचेरीमध्ये जातीय तणाव निर्माण होऊन जी दंगल झाली त्यामध्ये जनसंघाचा फार मोठ्या प्रमाणावर हात आहे, याबद्दल मला संशय वाटत नाही. सर्वच राजकीय पक्षांतील हिंदूंनी मुस्लिमांवर हल्ले करण्यात भाग घेतला, हे पुराव्यानिशी सिद्ध झालेलं आहे.

त्याच वेळी मार्क्सवादी पक्षाच्या नेत्यांपैकी कोणीही या दंगलीमध्ये भाग घेतला नाही, हे वादातीतपणे सिद्ध झालेलं आहे. उलट मार्क्सवादी कार्यकर्त्यांना २९ तारखेला संध्याकाळी पक्षाचा ध्वज लावलेल्या गाडीतून हिंडून सर्वांना शांतता राखण्याचं आवाहन केलं, असंच पुराव्यामध्ये नोंदलं गेलं आहे.'

## ओळींमधला अर्थ

१९७१ साली झालेल्या दंगलीवर चौकशी समितीने दिलेल्या अहवालाचा हा एक निवडून काढलेला तुकडा १९७९ साली प्रसिद्ध करण्यात आला. वरकरणी या दोन गोष्टींमध्ये काहीच संबंध दिसणार नाही; पण थोडं खोलात जाऊन विचार केला तर असं लक्षात येईल की, तेलीचेरीमध्ये गेल्या वर्ष-दोन वर्षांत संघवाले आणि मार्क्सवादी यांच्यामध्ये ज्या काही चकमकी उडाल्या त्यामध्ये मुस्लिमांनी कुठेही भाग घेतलेला नाही. संघवाल्यांनी आपल्या हातून मुस्लिम मार्क्सवादी जखमी होणार नाही किंवा मारला जाणार नाही, याची पुरेपूर दक्षता या संबंध संघर्षात घेतली. आठ वर्षांपूर्वी तेलीचेरीत घडलेली दंगल ही सर्व हिंदू आणि मुसलमान यांच्यामध्ये झाली होती. दोन्ही पक्षांनी मालमत्तेची नासधूस भरपूर केली, मात्र प्राणहानी फारशी झाली नाही किंवा हेतुपुरस्सर टाळलीच. कारण तोही मलबारमध्ये एकमेकांची ताकद अजमावून पाहण्याचाच प्रकार होता. मात्र त्या वेळी तेलीचेरीतलं संघाचं काम आताप्रमाणे मार्क्सवाद्यांच्या डोळ्यांवर आलं नव्हतं. त्यामुळे देशात इतर ठिकाणी घडतं त्याप्रमाणे किंवा अगदी तेलीचेरीतच आठ वर्षांपूर्वी घडलं त्याप्रमाणे अशा संघर्षांना 'हिंदु-मुसलमानांमधील जातीय दंगल' असं लेबल लावून मोकळं होणं या वेळेला मार्क्सवाद्यांना जमलं नाही. तेव्हा संघवादी जर मुस्लिमांवर हल्ले करत नसतील तर किमान मुस्लिमांच्या तरी हिंदुविरोधी भावना उद्दीपित कराव्यात आणि काही जमलं तर पहावं, असा दुष्ट हेतू हा तुकडा प्रसिद्ध करण्यामागे दिसतो. कारण अहवाल म्हणून एकूण प्रसिद्ध केलेल्या भागापैकी जवळजवळ तीनपंचमांश भाग श्री. गोळवलकरगुरुजी काय म्हणाले, हे देण्यातच–तेही संदर्भहीनपणे देण्यातच–घालवला आहे.

आणखी एक गोष्ट म्हणजे १७ मेला तेलीचेरी येथील पोटनिवडणूक होती. या पोटनिवडणुकीमध्ये संघवाले सी. पी. आय. च्या उमेदवाराचा प्रचार करत होते. कारण मार्क्सवादी उमेदवार पाडायचा, एवढं एकच उद्दिष्ट त्यांनी या निवडणुकीत ठेवलं होतं. अशा वेळी मुस्लिमांना आपल्या बाजूनं वळवण्यासाठी, किमान ते संघवाल्यांच्या बाजूनं जाऊ नयेत, एवढ्यासाठी १३ मेच्या अंकात हा तुकडा देण्यात आला असावा आणि मार्क्सवाद्यांचा हा डाव यशस्वीही झाला. मुस्लिमांनी मार्क्सवादी पक्षाच्या उमेदवाराला मतं दिल्याचं इंदिरा-काँग्रेसच्या नेत्यांनीदेखील मान्य केलं.

याच अंकामध्ये 'CPI Woos Rss Votes In Tellicherry' या शीर्षकाखाली एक लांबलचक प्रचारकी थाटाचा लेख प्रसिद्ध करण्यात आला आहे. त्यामध्येही तेलीचेरीमध्ये संघवाल्यांच्या मदतीने सी. पी. एम. चा उमेदवार निवडून येण्याचा प्रयत्न करत आहे. तेव्हा हा प्रयत्न झुंडशाहीला आणि दहशतवादाला विरोध करणाऱ्या सर्व शक्तींनी मोडून काढावा, असं आवाहन केलं आहे.

People's Democracy चा अंक interesting वाटला म्हणून एका पेपरस्टॉलवरून ६ मेचाही अंक मिळवला. त्यामध्ये तर संघविरोधी प्रचाराची जोरदार आघाडी उघडली होती. श्री. सी. पी. नारायण नावाच्या एका लेखकानी Rss's Murderous Attack On CPI ( M ) In Kerala– What Game is The Ruling Front Playing!' असं जोरदार शीर्षक असलेला एक लेख लिहिला आहे. आपल्या लेखात श्री. नारायणन म्हणतात–

'अखिल भारतीय मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षानं आणि केरळच्या कन्नोर जिल्ह्यातील लोकशाहीवादी चळवळींनी काँग्रेसचे गुंड आणि पोलीस यांच्याशी आणीबाणीच्या काळात यशस्वी टक्कर दिली आणि आता गेल्या काही महिन्यांमध्ये आणखी एका शक्तीकडून होणाऱ्या हल्ल्यांना ते तोंड देत आहेत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही संघटना सध्या केरळातील मार्क्सवाद्यांवर आणि (पर्यायाने?) लोकशाहीवादी चळवळींवर हल्ला चढवत आहे.

'सप्टेंबर १९७८ पासूनच संघवाल्यांनी मार्क्सवाद्यांच्या कार्यकर्त्यांवर आणि मार्क्सवाद्यांबद्दल सहानुभूती असणाऱ्यांवरही खुनी

हल्ले केले आहेत. एकट्या तेलीचेरीतच अशा प्रकारच्या हल्ल्यांमध्ये नऊ कॉमरेडस् मारले गेले व २९ जण गंभीर जखमी झाले. जखमींना अनेक दिवस, काहींना तर कित्येक आठवडे दवाखान्यात राहावे लागले. कित्येक जण जन्माचे अपंग झाले आहेत.

संघवाले असा सर्वत्र जाहीर प्रचार करतात की, मार्क्सवादी लोक त्यांच्या कार्यकर्त्यांवर पूर्वनियोजित हल्ले चढवतात आणि खून करतात. अशा प्रकाराच्या हल्ल्यांमध्ये त्यांचे सहा कार्यकर्ते मारले गेले आहेत आणि नऊ जण गंभीर जखमी झाले आहेत, हेही संघवाल्यांनीच सर्वत्र सांगितले आहे.

'परंतु मृत वा जखमींचं दोन्ही बाजूंकडील हे जे प्रमाण आहे त्यावरूनच पूर्वनियोजन करून हल्ले कोण करत आहे हे सहज लक्षात येईल.

## आमचा तात्त्विक लढा

या ठिकाणी हे लक्षात ठेवलं पाहिजे की, तेलीचेरी आणि त्याची उपनगरं मार्क्सवाद्यांचे बालेकिल्ले आहेत आणि ही गोष्ट कोणताही राजकीय पक्ष, अगदी संघवालेसुद्धा अमान्य करू शकत नाहीत आणि तरीदेखील अशा बालेकिल्ल्यांमध्ये संघवाले मार्क्सवाद्यांचो एवढी हानी करू शकतात. याचं कारणच हे आहे की, या सबंध प्रकरणामध्ये मार्क्सवादी अतिशय संयमाने वागत आहेत आणि जेव्हा अपरिहार्यच असेल तेव्हा फक्त स्व–संरक्षण करत आहेत. जर मनात आणलं तर तेलीचेरी आणि आसपासच्या भागामध्ये संघवाल्यांचा चालू असलेला हा दहशतवाद मार्क्सवादी सहज निपटून काढू शकतील; पण संघवाल्यांशी सुरे आणि बॉम्बच्या सहाय्याने नाही तर तात्त्विक आणि राजकीय पातळीवर लढा द्यायचं मार्क्सवाद्यांनी ठरवलं आहे

'संघवाल्यांच्या या गुन्हेगारी प्रवृत्तींना आळा घालण्याचं काम राज्यसरकारचं आहे; पण यामध्ये सरकार संपूर्णपणे अपयशी ठरलं आहे. तेलीचेरीमध्ये कॉं. इ. एम्. एस्. नंबुद्रीपाद यांचं नुकतंच एक भाषण झालं. त्या भाषणामध्ये त्यांनी सरकारला असं ठणकावून सांगितलं आहे की, जर सरकारने त्याचा थंडपणा सोडला नाही तर मार्क्सवादी पक्षालाच संघवाल्यांची ही हिंसक कृत्यं थांबवण्यासाठी आणि त्यांच्यापासून पक्षाच्या कार्यकर्त्यांचं रक्षण करण्यासाठी काही ठोस पावलं उचलावी लागतील, निश्चित कृती करावी लागेल.

'संघवाल्यांनी अशा प्रकारचे खुनी हल्ले केल्यानंतरही सी. पी. आय. व कॉंग्रेस यांच्या आघाडी सरकारने त्याचा निषेध केला नाही. उलट संघवाले आणि मार्क्सवादी या दोघांनीही हिंसेचा अवलंब करू नये, असं म्हणून ते तटस्थ राहिले. अशा तऱ्हेने संघवाल्यांची मार्क्सवाद्यांशी बरोबरी करण्यातूनच हे लक्षात येतं की, सी. पी. आय. आणि कॉंग्रेस हे दोघंही संघाला विरोध करण्यात कितपत गंभीर आहेत! संघवाले आणि मार्क्सवादी या दोघांनी एकमेकांशी झुंजावं अशीच यांची इच्छा आहे. कारण त्यांना अशी आशा आहे की, त्यामुळे या भागातील मार्क्सवाद्यांच्या शक्तीचं खच्चीकरण होईल आणि त्याचा फायदा त्यांना उठवता येईल.

## सरकारही त्यांनाच सामील

तेलीचेरीतील संघवाले आणि आघाडी सरकार यांचं काही तरी साटं–लोटं आहे, अशी शंका येण्याइतपत अनेक कारणं आहेत. १९७१ साली तेलीचेरीतील जातीय दंगलीबद्दल जी न्यायालयीन चौकशी झाली त्यात हे निष्पन्न झालं होतं की, या दंगलीत संघवाले सक्रीय सहभागी झाले होते; पण राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था यंत्रणेने त्यांना मूक संरक्षणच दिलं. तेव्हापासून केरळमधील प्रत्येकाचीच या बाबतीत खात्री पटली आहे.'

या लेखाचा सूर किती राजकीय आहे आणि त्याच्यात केवढी पुनरुक्ती आहे, हे वेगळं सांगण्याची गरज नाही. खरं म्हणजे मागील लेखात वर्णन केलेल्या केरळ विधानसभेतील चर्चेत मार्क्सवादी प्रतिनिधींनी जी भाषणं केली त्यात आणि या निवेदनात काहीही फरक नाही. संघावरील आरोपही नेहमीप्रमाणे तेच तेच आणि ठोकळ पद्धतीचे आहेत. मात्र अशा तऱ्हेने केवळ प्रचाराचा धूमधडाका करून हा प्रश्न सुटणार नाही, हे मार्क्सवादी पक्षाने ओळखण्याची गरज आहे. त्यांच्यापैकी थोडाफार तटस्थपणे विचार करू शकणारे पुष्कळ लोक केरळमध्ये आहेत आणि मार्क्सवादी मंडळींनी फार मोठ्या प्रमाणावर आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे, असं त्यांचं म्हणणं आहे. अद्यापही, बुद्धिजीवी, सरकारी नोकर, शिक्षक, प्राध्यापक, विद्यार्थीसंघटना यांच्यामध्ये संघ फारसा पसरलेला नाही, मार्क्सवादी विचारसरणीचंच प्राबल्य आहे; पण संघाच्या कार्याचा रेटा एळवा, कोळी, हरिजन आणि कारागीर या वर्गांत संघ ज्या झपाट्याने वाढतोय तो झपाटा पाहून मार्क्सवाद्यांना जाणवतोय. शिवाय सरकारी नोकर तर नेहमीच स्वार्थ सांभाळणारे असतात, हे आपण पाहतोच. त्यांनी मार्क्सवादी सरकार फार जवळून पाहिलं आहे. इ. एम एस. हा कोणी देवदूत तर नाहीच; पण साधा क्रांतिदूतदेखील नाही, अशी या मंडळींची खात्री पटत चालली आहे. जनमानसात स्थान असलेले आणि सत्ता जवळ दिसताच कुणाशीही तडजोड करणारे इतर अनेक प्रांतिक पातळीवरचे नेते आहेत, त्यांच्यापेक्षा नंबुद्रीपाद काही फारसे वेगळे नाहीत असे स्पष्ट उद्गार एका सरकारी अधिकाऱ्यानेच काढले. ज्याच्यासाठी क्रांती करायची तो पक्ष विजनवासातून सत्तेच्या आसपास येताच, प्रसिद्धीच्या झोतात येताच क्रांती सीतेसारखी भूमिगत होते, असे जे बाबा आमटे म्हणाले आहेत त्याचा प्रत्यय केरळमध्ये जेव्हा जेव्हा मार्क्सवादी सत्तेवर आले तेव्हा तेव्हा आला आहे. आता ही 'भूमिगत सीता' पुन्हा पुन्हा प्रगट कशी होणार आणि ते काम कोण करणार? मुसलमानांशी वाटेल त्या तडजोडी करणारे मार्क्सवादी? एकीकडे हिंदू स्थितिवादाचा मार्क्सवादी धिक्कार करतात आणि दुसरीकडे सबंध जगात ज्यांच्या मागासलेपणाबद्दल कोणाचंही दुमत नाही, अशा मुसलमानांसाठी, सत्तेसाठी शय्यासोबत करतात. बुद्धिजीवींचे डोळे आता उघडत आहेत, १९६४ साली कम्युनिस्ट पक्ष फुटला तेव्हा प्रतिक्रियावादी कॉंग्रेसशी पटवून घेणारे' अशी खास शिवीगाळ त्यांनी उजव्या कम्युनिस्टांना केली आणि स्वत: प्रत्येक वेळी मुस्लिम लीगशी जमवून घेत राहिले. 'दुसरे पाकिस्तान' असा मल्लापुरम जिल्हा दिला, एवढंच नव्हे तर मोपल्यांच्या बंडात ज्यांनी हिंदूंवर जास्तीत जास्त अत्याचार केले होते अशांचा भारतीय स्वातंत्र्याच्या रौप्यमहोत्सवी वर्षात 'स्वातंत्र्यसैनिक' म्हणून गौरव केला, त्यांना ताम्रपट दिले. 'या bloody fools नी हे सगळं केलं' हे जळजळीत उद्गार एका पूर्वाश्रमीच्या मार्क्सवाद्याचे आहेत.

### मंत्र संपला, फक्त तंत्र आहे

संघाच्या स्थानिक, शहर, जिल्हा, विभाग आणि प्रांत या सर्व पातळीवरच्या लोकांशी बोलताना दर्शन घडत असे ते जिद्दीचं, आत्मविश्वासाचं आणि अभिमानाचं. मात्र मार्क्सवादी मंडळी अडचणीत येणारे प्रश्न विचारताच गोंधळून जात, टाळाटाळ करीत. संघकार्यकर्ते सध्या एका मनमोकळ्या मूडमध्ये आहेत. कारण People's Democracy मध्ये ' मलबार भागात आम्ही आणि इतर लोकशाहीवादी शक्तींनी आणीबाणीशी लढा दिला ' असं मार्क्सवादी म्हणत असले तरी खरा लढा संघाने दिला हे सर्वसामान्य जनतेलाही माहीत आहे. शिवाय केरळमधील संघाचं काम खूप उशीरा सुरू होऊनही हजार शाखांचं उद्दिष्ट गाठणारा केरळ हा हिंदुस्तानातला पहिला प्रांत ठरला. त्यांची संख्या आता दीड हजार आहे. त्यामुळेच एका मनमोकळ्या आत्मगौरवाच्या मूडमध्ये ' होय, आमच्याकडे आर्थिक आघाडीवर फारसं सांगण्यासारखं आता काही नाही; पण पाच वर्षात आम्ही नक्की काही तरी सांगू ' अशी कबुली ते देऊन टाकतात. संघाचे एकशेतीस प्रचारक केरळमध्ये आहेत. मार्क्सवाद्यांचा खरा लढा आहे तो या वेगळ्या कार्यपद्धतीशी. संप, मोर्चे, सभा, अधिवेशन, घेराओ, बंद, कामगार-शेतकरी यांचे मेळावे यांचा अतिरेक झाल्यामुळे त्यांची धार बोथट झाली आहे. तंत्र शिल्लक राहिले आहे, मंत्र तर निघून गेला आहे, हेही तटस्थपणे विचार करणारे मान्य करतात. त्यामुळे या संघर्षाची पाळं-मुळं स्थानिक आणि दैनंदिन वर्तमानपत्रीय रकान्यात सापडणार नाहीत, त्यासाठी थोडं मागे जावे लागेल. ते पुढील अंकी !

(क्रमशः)

---

पुस्तके

# गंमतीदार गोष्टी

## वोट धरधरून

' वोट धरधरून ' हा सौ. शकुंतला फडणीस यांच्या विनोदी कथांचा पहिलाच संग्रह. गेल्या आठ–नऊ वर्षांत त्यांनी ' माहेर ' ' मानिनी ' ' बुवा ' ' रूपा ' ' सह्याद्री ' इत्यादी मासिकांतून जे हलकेफुलके लेखन केले, ते या संग्रहात एकत्रितपणे वाचताना, शकुंतला फडणीस यांच्या लेखनाशी अधिक जवळीक निर्माण होते.

मध्यमवर्गीय लेखकाचे वा लेखिकेचे प्रत्यक्ष अनुभव अतिमर्यादित, परंतु जीवनात वेगाने येणाऱ्या बदलांची स्पंदने या मर्यादित वर्तुळातही सर्वांच्या वाट्याला येतातच. जुन्यानव्या पिढीतला सतत ' बिघडणारा संवाद, ' हा आयुष्याचा एक भागच आहे. सर्वांनाच तो अनुभवावा लागतो. आपल्या मागून वीसपंचवीस वर्षांनी आलेली तरुण मुले–मुली यांच्या वेषांतून, बोलण्यातून, वागण्यातून, विचारप्रदर्शनाच्या पद्धतींतून, जे अत्याधुनिक बदल आपण पाहतो ते पुष्कळ वेळा आपल्याला हास्यास्पद वाटतात. ज्याच्या त्याच्या स्वभावाप्रमाणे माणसे रागावतात, चिडतात वा या सर्व प्रकाराकडे गंमतीने पहातात.

गंमतीने पहाण्याचा पर्याय सर्वांत उत्तम. या वरवरच्या बदलाचे परिणाम फार गंभीर होणारे नसतात. मुलाने झुलपे ठेवली म्हणजे कुणी केसाने गळा कापीत नाही किंवा कुणी ऐन थंडीतही स्लीव्हलेस वापरले, म्हणून लगेच निमोनिया होत नाही. शकुंतला फडणीस यांनी गंमतीचाच उत्तम पर्याय पत्करला आहे. त्या सर्वत्र गंमतीने पहातात.

' दुनिया की कोई ताकत ' या कथेत ' पिक्चरिया ' झालेला कु. पिंकीच्या प्रेमाचा बोजवारा त्या सांगतात, ' करीन तर ' मधे ' नाही. नाही. नाही ! साफ सांगते मी दाखवून घेणार नाही. ' असे सांगणारी अरुणा, कुणाच्या तरी प्रेमात पडण्याचा जो सतत प्रयत्न करते त्याचे वर्णन येते. ' कव्हर गर्ल '-मध्ये मासिकाच्या मुखपृष्ठावर येण्याचे मुलीचे आकर्षण, आणि पत्रकारांची चलाखी मार्मिकपणे येते.

' एक सबंध सात अर्धी ' या कथेची कल्पना सुंदर आहे. लग्नाला बारा–बारा वर्षे झाली तरी ' अजून यौवनात मी ' असे म्हणणाऱ्या स्त्रिया आहेत. अनेक लोकांच्या दृष्टीचे आपण अजून विषय आहोत, या सुखद कल्पनेत त्या वावरत असतात. अशीच एक उत्तम केशभूषा-वेषभूषा करून स्वतःची तीन आणि नात्यातली चार छोटी मुले घेऊन सिनेमाला निघालेली स्त्री आहे. रस्त्यात, बसमध्ये, थिएटरात, सर्वजण त्या बाईकडे तिला अगदी 'हवे तसे' बघतात शेवटी एका अडाणी बाईकडून तिला कुतूहलाचे रहस्य कळते. ती बाई म्हणते ' आता या खेपेला तरी ऑपरेशन करा म्हणावं ! '

' मिलिटरी सर्दी ', ' दोन बायका, नऊ पोरे, दीडशे गाढवे ' ' म्याव म्याव चले जाव ' व ' परीक्षा ' या कथांतून लेखिकेच्या कल्पनाशक्तीचे स्वरूप लक्षात येते. रिकाम्या मिलिटरी हॉस्पिटलात एकुलता एक पेशंट अचानक आला तर? मध्यमवर्गीय सिव्हिल इंजिनियरचे संसाराचे अर्थशास्त्र मातीवडाराच्या अर्थशास्त्रांशी अवचित भिडले तर? नको असलेली मांजराची पिल्लं हाकलली आणि पुनः एखादे हवे असले तर? किंवा ज्याचे सगळे लक्ष धंद्यात आहे,असा मारवाडी मुलगा शिकवणी ठेवूनही नापास झाला, तरी कदाचित पासांची संख्या लक्षात घेऊन तो ताबडतोब पेढ्यांचा धंदा करणार नाही कशावरून ? असे प्रश्न लेखिकेला सुचतात आणि त्याभोवती कथा रचण्याचे काम लेखिका करते. केवळ कल्पनेवर गोष्ट बांधताना–लेखिकेची तारांबळही उडालेली आहे, परंतु मूळ कल्पना खरोखरच गंमतीदार असल्याने कथांची वाचनीयता तशीच रहाते.

शकुंतला फडणिसांपाशी विशेष कल्पनाशक्ती आहे, एक गंमतीदार दृष्टिकोन आहे; परंतु त्यांची कथा पुनः पुनः निवेदनाच्या आवर्तात सापडते. या निवेदनात पुनरुक्तीचा दोष येतो–' सतरावी स्वैपाकिण' सारख्या कथेतून हे दोष प्रकर्षाने आहेत. चुरचुरीत भाषा हे मात्र लेखिकेचे वैशिष्ट्य आहे.

अनेक लेखिका आज प्रामुख्याने लिहीत आहेत त्या कथा–कादंबऱ्या ! यांत शकुंतला फडणीस यांनी वेगळी वाट ठेवली असल्याने, त्यांच्या लेखनाला मागणी राहील. मागणी वाढण्यात धोकाही संभवतोच ! (कुणी मागणी घातली म्हणजे मुलगी नेहमीच सुंदर

असतेच असे नाही, किंवा कुणी मागणी घातली नाही म्हणजे मुलगी देखणी नसते असेही नाही) कारण योग्य चांगल्या विनोदी लेखकाला जेवढे भांडवल लागते तेवढ्या श्रमांच्या भांडवलात बऱ्याच सामान्य गंभीर कथा लिहिता येतात. म्हणून या संग्रहात जाणवलेले दोष मी सांगितले आहेत.

या कथासंग्रहात आणि मुखपृष्ठावर शि. द. फडणिसांची जी चित्रे आहेत, त्यांचा विशेष निर्देश केला पाहिजे इतकी ती वेधक आहेत. चार–दोन ठसठशीत रेषात शि. द. फडणिसांनी आपल्या पत्नीच्या कल्पना साकार केल्या आहेत. चित्रे इतकी सुंदर आहेत की शि. द. फडणिसांशी विवाह केला, ही देखील लेखिकेच्या लेखनाची एक जमेची बाजू ठरावी.

–वि. ग. कानिटकर

**बोट धरधरून**
शकुंतला फडणीस
उत्कर्ष प्रकाशन, पुणे ४
मूल्य दहा रुपये

---

## फिनिक्स ग्रंथालय

### जे. एन्. पोंडा

## In The Shadow of Man

**By L. Jons Van Lawick–Goodall**
**[ Book Club Associates, London,**
**Hardcover Edition,**
**Rs. 60·00, Pages 256. ]**

---

हे पुस्तक म्हणजे एका बाईने चिंपांझी प्राण्यावर केलेले संशोधन. चिंपांझी आफ्रिकेच्या उष्ण प्रदेशात रहातात. सर्व माकडांच्या जातीत ते हुषार समजले जातात. हे प्राणी साधी अवजारेसुद्धा वापरू शकतात व ते माणसाशी दळणवळण (Communicate) करू शकतात.

केवळ चिंपांझी या प्राण्यावर संशोधन करण्याकरिता ही लेखिका पुष्कळ वर्षे आफ्रिकेतील टांगानिकाच्या एका सरोवराजवळ राहिली होती. पहिले तीन महिने तर चिंप तिला बघून लांब पळत ! पण तिने चिकाटीने आणखी एक वर्ष त्यांच्या विश्वात रहाण्याचा प्रयत्न केला. शेवटी शेवटी चिंप्सनी तिचा आपल्यातीलच एक म्हणून स्वीकार केला. एक मित्र दुसऱ्याला ओळखतो तसे ती त्यांना ओळखायला लागली. बऱ्याच चिंप्सची तिने नावेसुद्धा ठेवली. त्यांच्या सवयींचे व जीवनाचे तिने बारकाईने अवलोकन केले. जंगलात रहाताना ती पुष्कळ वेळा आजारी पडली; परंतु त्याची तमा न बाळगता जीव धोक्यात घालून तिने आपले कार्य चालू ठेवले.

स्त्रियांना 'Fair Sex' व 'Weaker Sex' असे संबोधिले जाते. त्याचा त्यांना रागही येतो. स्त्रियांवर इतर अन्यायही होतात. या सर्वांची परिणती स्त्री-मुक्तीत होते. या लेखिकेने एका विषयात खोल जाण्यासाठी जेवढे कष्ट घेतले तेवढे घेण्याची क्षमता जर स्त्रियांत असली तर त्यांना 'Weaker Sex' म्हणून चालणार नाही. कॅनडात तर आता संरक्षणदलातसुद्धा स्त्रियांची भरती होत आहे असे ऐकतो. आपल्या देशातील स्त्रियांनी असे काही करून दाखवावे आणि नंतर स्त्री-मुक्तीचे मोर्चे काढावेत ! आपल्या काही स्त्रिया हिमालयात उत्तुंग शिखरे चढण्यासाठी जातात हे प्रशंसनीय आहेच ! नुसत्या कपड्यांचे व केशभूषांचे अनुकरण करून, धूम्रपान व मद्यपान करून पुरुषाशी बरोबरी करता येत नाही. मला वाटते, काही वर्षांनी अमेरिकेत पहिल्यांदा रेप हा गुन्हा करण्यात स्त्रिया पुढाकार घेतील. अशी स्त्री-मुक्तीची अंतिम परिणती होईल का ? आत्ताच USA मध्ये एका कोर्टाने मिळवत्या बायकोकडून नवऱ्याला पोटगी देवविली.

या पुस्तकाचा मजकूर जेवढा मनोवेधक आहे तितकीच छायाचित्रेसुद्धा आकर्षक आहेत. आधी नॅशनल जिऑग्राफिकमध्ये हप्त्याहप्त्यांनी या संशोधनाची माहिती दिली होती. ही छायाचित्रे या लेखिकेच्या यजमानानेच घेतली होती.

चिंपांझींना माणसांचे अगदी जवळचे नातेवाईक समजले जाते. त्यांचे कौटुंबिक व सामाजिक जीवन, त्यांची निष्ठा व वैमनस्य ठेवण्याची तऱ्हा, त्यांचे कामुक जीवन, लहान मुलांबरोबरची व म्हाताऱ्या माणसांबरोबरची वागणूक हे सर्व बरेचसे आपल्यासारखेच असते आणि म्हणूनच या पुस्तकाला शास्त्रीय दुनियेत एवढे महत्त्व दिले जाते. लेखिका तर या प्राण्यापासून इतके काही शिकली की, तिच्या स्वतःच्या मुलाला मोठे करण्यात तिने ते ज्ञान वापरले. माणसाचे भवितव्य काय ? असे बऱ्याच वेळा गणकयंत्रांना विचारण्यात येते; पण हे पुस्तक वाचून माणसाचे भवितव्य काय, माणूस असा का वागतो वगैरे गोष्टींचा पुष्कळसा थांगपत्ता लागतो. प्राण्यांपासून केलेले प्रयोग माणसांशी generalize केले जातात, त्याला ethology म्हणतात. या लेखिकेला चिंपांझी या विषयाबद्दल डॉक्टरेट दिली गेली.

चिंपांझी मांस खातात, हे वाचून मला थोडे आश्चर्यच वाटले. वानर म्हणजे केळी, शेंगदाणे व इतर व्हेजिटेरियन डिशेस खाणारा प्राणी आहे अशी माझी कल्पना होती. दुसऱ्या जंगली जनावरांनी जर एखादे सावज मारले तर मढ्याजवळ ते कुणाला फिरकू देणार नाहीत; पण चिंपांझी मात्र माणसासारखा 'शेअर' करणारा प्राणी आहे. तो मेलेल्या सावजाजवळ असला तर अक्षरशः त्यातील मांसाचे तुकडे दुसऱ्याला देईल !

चिंपांझीचा क्लायमॅक्स फार लवकर येतो. दहा ते पंधरा सेकंदांत ! (याला शीघ्रपतन म्हणावे का ?) या पुस्तकाची लेखिका तर चिंपांझींचे कामुक जीवन इंग्लंड व अमेरिकेच्या तरुण मंडळींसारखे आहे असे म्हणते. प्रोमीस्क्युअस ! म्हणजेच मुक्त लैंगिक स्वैराचार ! जेव्हा मादी हीटमध्ये असते तेव्हा तिचा रंग गुलाबी होतो. असल्या वेळेला लेखिका तिला 'The Pink Lady' म्हणून संबोधते. या अवस्थेतील तिची वर्तणूक वाचली की आपली बरीच करमणूक होते.

ज्या आईला दुसरे मूल होते तेव्हा तिला sibling rivalry ही काय चीज आहे ते न सांगता कळते. पहिले मूल दुसऱ्या मुलाचा हेवा करते. आई दुसऱ्या मुलाकडेच सारखे लक्ष देते असे त्याला वाटते. आपली आता चक्क उपेक्षाच होत आहे इथपर्यंत या भावनेचा उद्रेक होतो व थोड्या काळापुरता का होईना पण पहिले मूल प्रॉब्लेम चाइल्ड

होऊन बसते; परंतु आईने थोडे प्रेम दाखवले की परत गाडी रुळावर येते. ज्या मुलाला भाऊ-बहीण आहे, ते मूल या अवस्थेतून केव्हा ना केव्हा तरी जात असते. चिपांझीमध्येसुद्धा अशीच sibling rivalry असते.

काही चिंपांझी झाडांवर पक्ष्यांसारखे घरटे करून झोपतात. पाऊस आला तर ते कुठेही आसरा घेत नाहीत. चिनी लोक जसे चोपस्टिकने भात खातात तसेच चिपांझी पातळ काड्यांनी वाळवी धरतात ! नुसत्या आवाजावरून एक चिंपांझी दुसऱ्याला ओळखतो. कधी कधी मी aggressive नाही हे दाखवण्यासाठी चिंप आपले दोन्ही हात वर करतो. विशेष करून लहान चिंप्सना मी दुखापत करणार नाही असे दाखवायचे असले तर ते दोन्ही हात वर करून दाखवतात. लहानांचा जन्म झाला की मोठे चिंप्स पुष्कळच खेळकर बनतात. कधी कधी लेखिका तिच्या शर्टाखाली (होय, शर्ट ! स्त्री-मुक्ती! ) केळी लपवते. त्या वेळी एक चिंप तिचा शर्ट वर करून बरोबर केळी शोधून काढतो. अशा अनेक दृश्यांचे सुंदर फोटो या पुस्तकात आहेत. मूळ हे फोटो नॅशनल जीओग्राफिक मॅगेझिनमध्ये छापले होते. मग त्यांच्या गुणवत्तबद्दल वेगळे सांगायला नकोच. या पुस्तकात लेखिकेचा नवरा पाऊस कोसळत असताना (तेही आफ्रिकेच्या जंगलात), एका पायावर छत्री उघडून उभा राहून फोटो घेत असल्याचा फोटो आहे. तो पाहून हौशी क्रिकेटपटूवर वेळ आली तर स्वतःला इजा करून घेऊन सुद्धा ' कॅच ' कसा सोडत नाही त्याची आठवण येते.

Aggression या शब्दाचा मराठीत कुरापती काढणे असा अर्थ दिला आहे. परंतु तो फारच मिळमिळीत वाटतो. अॅग्रेशनला हिंसाच म्हणावे लागेल. प्राणिमात्र हिंसा करण्यात पुढाकार का घेतो या विषयावर ethology ने बरेच संशोधन केले आहे. या पुस्तकात चिंपांझीच्या हिंसाचाराविषयी सुद्धा पुष्कळ माहिती आहे. माणूस शेवटी प्राणीच पण तो जेव्हा हिंसाचार करायला लागतो तेव्हा इतर प्राण्यासारख्या त्याला मर्यादा नसतात. त्या मर्यादा ओलांडून तो हिंसा करीत असतो. प्राणिमात्रांच्या हिंसाचाराविषयी काही शिकता आले तर त्यावरून ' माणूस ' हा प्राणी आपल्याला समजू शकेल आणि विश्वयुद्ध व इतर हिंसाचार थांबवता येतील अशी आशा या ethologist ना वाटते. मी आधी सांगितल्याप्रमाणे Konrad Lorenz या ethologist ने On Aggression या नावाचे एक माहितीपूर्ण पुस्तक लिहिले आहे. कॉनरॅड लॉरेन्झने या पुस्तकात असे लिहिले आहे की, प्राण्याच्या दुनियेत माणूस हा असा एकच प्राणी आहे की जो स्वतःच्या जातीतील इतरांना (म्हणजे माणसांना) पद्धतशीर व नेमाने मारतो; परंतु त्याचे वरील पुस्तक १९६३ मध्ये प्रसिद्ध झाले. नंतर काही संशोधकांनी असे शोधून काढले की माणूसप्राण्याशिवाय इतर कमीत कमी १५ प्राणी स्वतःच्याच जातीची हत्या करतात. आत्तापर्यंत अशी समजूत होती की, फक्त जगण्यासाठी किंवा भक्षण करण्यासाठीच माणूस सोडून इतर प्राणी हत्या करतात. वाघाचे पोट भरलेले असेल तर शेजारी हरीण आले तरी तो त्यास सहसा मारीत नाही, असा समज आहे. स्वतःच्या जातीला जेव्हा धोका असतो (अथवा केवळ स्वार्थापोटी, निव्वळ हिंसेसाठी हिंसा करायची असते) तेव्हा प्राणी हत्याकांड करतात, असे अगदी अलीकडे आढळून आले आहे.

लांब शेपटीचा व पुसट काळचा रंगाचा Langur जातीचा माकड हा आताआत्तापर्यंत शांत समजला जात असे. पण एका संशोधनात असे आढळून आले की या जातीच्या माकडाचा समाज House of Borgia सारखाच आहे ! लहान माकडांना मारून टाकणे, मातांनी जखमी झालेल्या बालकाला सोडून देणे, लैंगिक अत्याचार, आतल्या आत झगडणे वगैरे प्रकार सर्रास चालू असतात.

सारा ब्लॅफर हार्डी या बाईने आबू पर्वताच्या परिसरातील Langur जातीच्या माकडावर ' The Langurs of Abu ' हे पुस्तक लिहिले आहे. इतर जातींप्रमाणे या जातीतला सर्वात शक्तीमान नर इतरांवर वरचष्मा ठेवतो; पण एका ग्रुपमधला नर मेला की त्याच्या जागी जो दुसरा नर येतो तो पहिल्या नराच्या सर्वच्या सर्व लहान मुलांची हत्या करतो. शेवटपर्यंत मादी प्रतिकार करते; परंतु काही उपयोग नाही असे समजल्यावर मात्र त्या नराला संभोगासाठी शरण जातात ! कधी कधी हिंसा म्हणजे प्राणिमात्रात एक built-in, atavistric trait आहे असेच वाटते. प्राण्यांच्या संशोधनापासून काय काय शिकता येते याचा aggression हा एकच प्रकार झाला.

चिंपांझीचा मेंदू हा गोरिलापेक्षा माणसासारखाच आहे. त्यामुळे अनाथ मुलांना आपण कसे वाढवतो, मुलं मोठी करण्याची वेगवेगळया मातांची वेगवेगळी तऱ्हा यामुळ लहान मुलांवर काय परिणाम होतो हेसुद्धा चिंपांझीच्या मातेच्या वागणुकीवरूनच कळते. बालमानसशास्त्रज्ञांना यातून बरेच काही ज्ञान मिळते.

Puberty हा एक फार कठीण काळ असतो. चिंपांझी जेव्हा वयात येतो तेव्हा त्याच्या वागणुकीवरून आपल्या टीन–एजर्सना मार्गदर्शन करता येईल असेही लेखिका म्हणते.

आणि शेवटी चिम्पस व माणूस यांच्यामध्ये असलेल्या साम्यामुळे त्या वानरावर अनेक औषधांमुळे घडणारे शारीरिक व मानसिक बदल याचा अभ्यासही नेहमी चाललेला असतो.

सिंहीण सावज मारून स्वतः पहिले आपले पोट भरते व नंतर पिल्लांना खायला देते. वाघिणीने जर सावज मारले तर आधी पिल्ले व स्वतः नंतर ! चिम्पने जर बबुन मारले तर त्यातून तो सर्वांचे भाग ठेवतो. हे सर्व वाचून ' यात काय माठे वाचण्यासारखे असत ?' असे काही लोकांना वाटते; पण वरवर दिसते तितके ते नगण्य नाही. हे तपशील म्हणजे प्राण्यांच्या वर्तणुकीचे छोटेछोटे पैलू असतात. प्राण्याच्या वर्तणुकीचाच तो एक भाग आहे असे समजून ते वाचायचे असते आणि प्राण्यांच्या संपूर्ण वर्तणुकीचा अभ्यास करून त्याचे निकष ' माणूस ' या प्राण्याला लावायचे असतात. या संदर्भातून प्राण्यांच्या वर्तणुकीचा एक एक भाग अभ्यासायचा असतो. पुढच्या वेळेला जेव्हा तुम्ही प्राण्यांचे एखादे पुस्तक वाचाल तेव्हा हा मुद्दा जरूर लक्षात असू द्या !

—जे. एन्. पोंडा

# लोकतांत्रिक नेपाळ ही काळाची गरज आहे : पृष्ठ ८ वरून

आज ना उद्या राजाला सार्वमताचा दिनांक जाहीर करून मिळणारा निर्णय मान्य करावा लागेल. राजा सुज्ञ आहे आणि म्हणूनच उशीरा का होईना प्रजेची नाडी ओळखून तो वागेल असा माझा विश्वास आहे. लोकतांत्रिक नेपाळ ही अखेर काळाची गरज आहे. सध्या १९ वर्षांनंतर मुक्तपणे राजकीय पक्षांच्या सभा, सम्मेलने, मेळावे नेपाळात होऊ शकत आहेत. राजसत्तेकडून कोणतेही दमनतंत्र अवलंबिण्यात येत नाही. अशा सगळ्या परिस्थितीत राजे वीरेंद्र यांची भूमिका शंकास्पद आहे असे म्हणण्यास सध्या तरी वाव नाही.

**प्रश्न :** राजे वीरेंद्र यांच्याबद्दल आपले सर्वसाधारण मत काय आहे?

**उत्तर :** राजे वीरेंद्र यांना फक्त दोनदा प्रत्यक्ष भेटण्याचा योग आला होता, त्यामुळे राजांच्या एकूण स्वभावप्रवृत्तींबद्दल काही मत व्यक्त करणे अपरिपक्वतेचे लक्षण ठरेल; पण तरीही माझ्या मते पूर्वीच्या राजापेक्षा सध्याच्या राजाची भूमिका अधिक भावात्मक आहे, एवढे नक्की.

**प्रश्न :** वस्तुतः गेली अनेक वर्षे नेपाळातील लोकशाहीसाठी आपला चळवळ सुरू आहे. असे असताना आत्ताच चळवळीने अधिक जोर धरावा व लगेच त्याचा परिणाम दिसून यावा असे का? गेल्या दोन महिन्यांत असे काय घडले की अखेर आंदोलकांचे म्हणणे ऐकून राजाला सार्वमताचा निर्णय घ्यावा लागला?

**उत्तर :** देशत्याग करणाऱ्या माझ्यासारख्या काही नेत्यांनी १९७६ मध्ये आपणास अटक होईल याची जाणीव असतानाही नेपाळात प्रवेश केला. त्यानंतर आमच्यावर निर्बंध लादण्यात आले; पण ते पूर्वीपेक्षा कमी जाचक होते. फार काय; पण औषधोपचारासाठी परदेशात जाण्याची परवानगीही मला देण्यात आली. माझ्या मते याच काळात एक प्रकारच्या National Reconciliation च्या प्रक्रियेस आरंभ झाला. त्यानंतर मधल्या काळात घडलेल्या आंतरराष्ट्रीय घडामोडींनी राजसत्तेवर एक वेगळेच दडपण आणले. इराण आणि अन्य देशांतही, लोकांनी उठाव केला तर राजसत्ता उलथून टाकता येते हे दर्शविणाऱ्या घटना घडल्या होत्या. याच काळात आमची चळवळही अधिक परिपक्व झाली होती, या साऱ्याची परिणती भुत्तोंच्या फाशीविरुद्ध नेपाळी विद्यार्थ्यांच्या निदर्शनातून लोकक्षोभाला वाट मिळण्यामध्ये झाली. आणखी एक महत्त्वाचे कारण म्हणजे सगळ्यांनाच आपल्या बाजूला वळवून घेता येत नाही याची जाणीव अलीकडल्या काही घटनांतून राजाला झाली होती. थोडक्यात म्हणजे प्रत्येक गोष्टीला काही एक 'वेळ' यावी लागते तशी ती आता आली होती.

**प्रश्न :** कोईरालाजी, आपण स्वतः राजकीय वनवासात असताना देशात व देशाबाहेरही लोकतांत्रिक नेपाळ 'साठी आपली चळवळ सुरू होती. आपण ही भूमिगत चळवळ कशा प्रकारे संघटित करीत होता? राजसत्तेची दमननीती या काळात कशी कार्यरत होती?

**उत्तर :** स्वातंत्र्योत्तर काळात दडपशाहीशी मुकाबला करण्याची वेळ भारतीयांवर फक्त एकदा आली, ती म्हणजे आणीबाणीच्या काळात. तत्पूर्वी हुकुमशाहीशी आम्ही मुकाबला करू शकत नाही म्हणून कधीकधी भारतीय लोक आमचा उपहास करीत असत; पण इंदिराबाईंनी त्यांना चांगला धडा दिला. दमननीतीचा मुकाबला म्हणजे काय हे भारतीयांना तेव्हा समजले. आम्ही मात्र गेली १८ वर्षे या ना त्या प्रकारे जुलमी राजसत्तेला आव्हान देऊन लढत आहोत. आमच्या या लढ्यात शंभराहून अधिक जणांचा बळी द्यावा लागला आणि आमच्या सर्वच पक्षकार्यकर्त्यांना किमान चार वर्षे तरी गजाआड रहावे लागले. माझा एकही प्रमुख सहकारी असा नाही की जो आठ-दहा वर्षांपेक्षा कमी काळ कारावासात होता. १९६१, ६२ आणि नंतर १९७० मध्ये सशस्त्र उठावाचाही आम्ही प्रयत्न केला होता आणि या युद्धातच अनेक तरुण विद्यार्थी-कार्यकर्ते कामी आले. गाव हे एक युनिट मानून गुप्त बैठका, पत्रके, वृत्तपत्रे इ. विविध माध्यमांतून आमचा लढा आम्ही सतत सुरू ठेवला होता; पण सुदैव इतकेच की, लोकशाहीसाठी ही जी किंमत आम्ही माजली तिचे फळ मिळण्याची चिन्हे आता दिसू लागली आहेत.

आगामी सार्वमतात बहुपक्षीय लोकशाहीच्या बाजूने जनतेने कौल द्यावा म्हणून रोजी शंभराहून अधिक जाहीर सभा आम्ही घेत आहोत. परवा आठ जूनला १९ वर्षांनंतर पहिली महाप्रचंड जाहीर सभा काठमांडूत आम्ही घेतली. लोकशाहीच्या दृष्टीने पोषक असे वातावरण सध्या नेपाळात आहे. फार काय; पण सध्याच्या पंचायतींचे सदस्य देखील लोकशाहीच्या बाजूने उभे राहता यावे म्हणून आपल्या पदांचे राजीनामे देत आहेत.

**प्रश्न :** लोकशाहीवाद्यांची खंबीर फळी उभी करण्यासाठी अन्य पक्षांबरोबर आपण संयुक्त आघाडी वगैरे उभारणार आहात काय?

**उत्तर :** नेपाळी काँग्रेस या आमच्या पक्षाचे अन्य सर्व पक्षांशी चांगले संबंध आहेत. आमच्यात एक understanding जरूर आहे; पण सध्या तरी आघाडी उभारण्याच्या मागे आम्ही नाही. याचे आणखी एक कारण म्हणजे आमच्या पक्षाव्यतिरिक्त अन्य कुठलाही बलवान पक्ष नेपाळात नाही. एक कम्युनिस्ट पक्ष आहे; पण तुम्हाला ठाऊक असेलच की इतरांशी लढण्याऐवजी आपसात लढण्यात हे साम्यवादी मश्गुल असतात. काहीही असो, बहुपक्षीय पद्धती अखेर कम्युनिस्टांनाही फायद्याची असल्याने ते आम्हाला साथ देतील असे सध्या तरी वाटते.

**प्रश्न** : लोकशाहीवाद्यांच्या चळवळीत नेपाळी विद्यार्थी आघाडीवर असल्याचे व त्यांच्यावर तुम्हा वरिष्ठ नेत्यांचे पूर्ण नियंत्रण असल्याचे आपण एके ठिकाणी म्हटले आहे. या नियंत्रणाच्या मर्यादा कोणत्या? भारतातील गुजरात व बिहारच्या विद्यार्थी चळवळीनंतर त्या विद्यार्थीनेत्यांपैकी अनेकांची अधोगती झाली असाच 'अनुभव आहे. आपल्याकडे परिस्थिती कशी आहे ?

**उत्तर** : पहिली गोष्ट म्हणजे विद्यार्थीनेत्यांवर आमचे संपूर्ण नियंत्रण असले तरी नियंत्रण न मानणारे काही महाभाग जसे सर्वत्र असतात तसे आमच्यातही आहेत आणि विद्यार्थीनेत्यांच्या एकूण अनुभवाबद्दल म्हणालं तर तो निश्चितपणे चांगला आहे. कारण आठ–आठ, दहा–दहा वर्षे तुरुंगात काढल्यामुळे आमचे विद्यार्थीनेते अधिक जिद्दी व कडवे बनले आहेत. मला सांगा, तुमच्याकडे किती विद्यार्थीनेत्यांनी असा अनेक वर्षे कारावास भोगला होता ?

**प्रश्न** : भारत आणि नेपाळ या दोन्ही देशांच्या समस्या खूपशा सारख्याच आहेत. आमच्याकडे जातीय तणाव व दंगे ही एक सनातन समस्या होऊन बसली आहे. नेपाळातील परिस्थिती काय आहे ?

**उत्तर** : आमच्याकडे जातीय दंगेधोपे ही समस्या जवळजवळ नाहीच. एक तर अल्पसंख्याकांची संख्या खूपच अल्प आहे आणि एकूणच नेपाळी समाजाचे एक nature असे आहे की ही समस्या उद्भवलेली नाही.

**प्रश्न** : नेपाळ हे एक 'हिंदू राष्ट्र' म्हणून ओळखले जाते. त्या दृष्टीने हिंदू संघटनात रस घेणाऱ्या 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ' या संघटनेबद्दल आपले काही मत आपण व्यक्त कराल काय ?

**उत्तर** : कुठल्याही वादग्रस्त प्रश्नाबाबत खरे म्हणजे मी मत व्यक्त करू इच्छीत नाही. तरीही दोन महत्त्वाच्या गोष्टी मी सांगतो. एक म्हणजे हिंदू हा इस्लाम, ख्रिश्चन, ज्यू इ. सारखा 'धर्म' आहे असे मला वाटत नाही. हिंदू ही एक जीवनपद्धती आहे. त्यामुळे हिंदू शब्दाचा एक धर्म असा अर्थ घेऊन नेपाळला हिंदू राष्ट्र, म्हणून संबोधणे बरोबर नाही.

दुसरी गोष्ट म्हणजे संघाचे सरसंघचालक श्री. देवरस यांची माझी भेट झालेली आहे व ते माझे एक चांगले मित्र आहेत. तुमचे विदेशमंत्री संघाचे आहेत असे म्हणतात. तेही माझे एक खूप चांगले मित्र व हितचिंतक आहेत, इतकेच ! आमच्या वारंवार भेटीही होतात.

**प्रश्न** : उद्या नेपाळात खरेखुरे लोकशाही सरकार आले तर या सरकारचे नेपाळच्या सर्वांगीण विकासाचे धोरण कसे असेल ? थोडक्यात म्हणजे तुमच्या स्वप्नातील उद्याचा नेपाळ कसा असेल ?

**उत्तर** : लोकशाहीची स्थापना केल्यावर नेपाळचा सर्वांगीण आर्थिक विकास करणे हे आमचे मुख्य ध्येय राहील. तळातल्या समाजाचे जीवनमान उंचावण्याचा आम्ही कसोशीने प्रयत्न करू. छोट्या खेड्यातील गरीब गावकऱ्यांना सामाजिक, आर्थिक प्रतिष्ठा मिळवून देणे हे आमचे ध्येय राहील. गरीबी हटविणे हे आमचे लक्ष्य आहे !

अमेरिका, रशिया इ. देशांना परवडणारी अर्थनीती आम्हाला मानवणार नाही. अतिप्रगत तंत्रज्ञान आम्हाला झेपणार नाही. त्यामुळे आमच्या गरजा व आमची शक्ती ओळखूनच आम्ही विकासाचा आराखडा तयार करू. समाजवाद ही एक ढोबळ कल्पना आहे. आमच्या देशाच्या दृष्टीने तिचा योग्य अर्थ लावून आम्ही आर्थिक, सामाजिक वाटचाल करीत राहू.

**प्रश्न** : आता शेवटचा प्रश्न ! लोकशाहीच्या पुनस्स्थापनेच्या या लढ्यात भारतीय जनता व सरकार यांच्याकडून आपल्या काय अपेक्षा आहेत ?

**उत्तर** : आमच्या ज्या काही अपेक्षा आहेत, भारतीय जनता त्या पूर्ण करीत आहे. भारतीय जनतेचा संपूर्ण तात्त्विक पाठिंबा आम्हालाच आहे. जनतेची सहानुभूती आमच्याच मागे आहे. सरकारातही माझे अनेक मित्र आहेत. सरकारी वर्तुळात आमच्या आंदोलनाबद्दल सहानुभूती आहे. खरे म्हणजे जे पाठबळ सध्या मिळत आहे, तेवढीच माझी अपेक्षा आहे. शेवटी भारताने नेपाळवर चढाई करावी वा भारतीय जनतेने काठमांडूवर हल्ला करावा अशी काही माझी कल्पना नाही. तेव्हा जो पाठिंबा सध्या आहे तो कायम टिकावा हेच माझे मागणे आहे. □


# टॉलस्टॉय – एक माणूस

## लेखिका : सौ. सुमति देवस्थळे

आवृत्ती दुसरी । मूल्य पंचावन्न रुपये । राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

एक चुलते होते. त्यांच्याइतका चतुर आणि व्यवहारी माणूस पंचक्रोशीत नव्हता. एकदा एक ज्योतिषी आला आणि भूतभविष्य सांगून त्याने चुलत्याला इतके गार केले की त्यांनी कनवटीचा रुपया काढून त्याला दिला. (पन्नास वर्षांपूर्वीचा रुपया म्हणजे आजचे पंचवीस होत). ज्योतिषी निघून गेल्याबर ते अंगणात उतरले. अंगणात आमचा घरचा गडी काम करीत होता. त्याला त्यांनी 'जगात काय विलक्षण चमत्कार असतात' अशी सुरुवात-करून ज्योतिषाने आपणास प्रत्येक गोष्ट कशी बरोबर सांगितली याचे रसभरित वर्णन केले आणि या माणसाला आपल्या घरातल्या इतक्या गोष्टी कशा सांगता याव्यात याचे कौतुक केले. तेव्हा आमचा गडी म्हणाला, 'माझ्याशी तो बोलत होता, मला त्याने तंबाखू दिली. आपल्या घरचे सगळे विचारून तो आत गेला.'

असे ज्योतिषी असतात त्याबरोबरच आमच्याकडे एक कन्नड ज्योतिषी यावयाचा त्याचे उदाहरण देता येईल. आम्ही दोघे रस्त्याने जाऊ लागलो की समोरून येणारा मला परिचित असलेला माणूस मी त्याला पहावयास सांगे. तेवढे पाहून तो लगेच त्या माणसाबद्दल सांगण्यास सुरुवात करी आणि त्याच्याबद्दलचे तो सगळे अचूक सांगे! त्याने आमची जागा आम्हाला केव्हा मिळेल याचा दिवस आणि जागेचे संपूर्ण वर्णन, आम्हाला जागा मिळणार हे स्वप्नात नव्हते, तेव्हा सांगितले होते. मी मोठ्या पदयात्रेस जाणार हे मला त्याने महिनाभर आधी सांगितले होते. त्याला कुठली तरी देवता अनुकूल आहे असे म्हणत. पुढे या माणसाचा नूर उतरला. प्रकृति ढासळली. भविष्य चुकू लागले. आपल्यावर करणी केली आहे असे तो म्हणे.

मला नेहमी वाटते की, या कन्नड ज्योतिषाप्रमाणे आपल्या ज्योतिषशास्त्रपारंगत ज्योतिषांनी ठामपणे भविष्य सांगावे. ते भविष्य असे सांगतात, 'हा काल अनुकूल नाही – सावध रहावे' (अनुकूल नाही म्हणजे काय? आणि 'सावध रहावे' म्हणजे काय करावे?) 'या दिवसात प्रयत्न केल्यास यश येईल.' (प्रयत्न होईल का सांगा ना.) मला वाटते असे मोघम भविष्य न सांगता त्यांनी ठाम दिवस, काय होणाराय तेही ठाम सांगावे. चुकले तर चुकले. आपले ज्योतिषी शब्दांत अडकावयास भीत असावेत किंवा काही वेळा त्यांना आत्मविश्वास नसावा किंवा अंतःस्फूर्ति कमी पडत असावी. समजा, एका पत्रिकेत पंचमस्थान बिघडलेले आहे. पंचमस्थानातून सुत, बुद्धी, विनय, गर्भ, नीति, मंत्रविद्या इत्यादि गोष्टींचा विचार करितात. आता यापैकी या पत्रिकेत काय बिघडले आहे म्हणून सांगावयाचे? सगळ्याच व्यवसायात अंतःस्फूर्ति लागते. तशी याही व्यवसायात लागते. ती यासाठी. एके काळी गाजलेल्या ग्रहनक्षत्रफलादेश मंडळाचे अध्यक्ष व अनेक ज्योतिषांचे गुरू श्री. के. भट यांनी सांगितलेले एक उदाहरण छान आहे. ते म्हणाले, 'एक गृहस्थ आपल्या मुलाची पत्रिका घेऊन आले. पत्रिका पाहून मी सांगितले,' हा मुलगा अत्यंत हुषार, परदेशात शिक्षण घेतलेला, मोठ्या हुद्द्यावर आहे. याही पुढे तो अनेकदा परदेशगमन करील.' भटसाहेब म्हणाले, 'मी हे सांगत असता तो गृहस्थ मख्ख होता. काही वेळ माझे ऐकून तो उठला. त्याने खिशातून दहा रुपयाची नोट काढली. माझ्यापुढे ठेवली. मला नमस्कार केला आणि पाठ वळवून निघाला. मी त्याला थांबवून विचारले, 'चुकलं का काही?' तो म्हणाला, 'काय सांगू! हा आमचा मुलगा जन्मतः लुळापांगळा आहे. आज पंचवीस वर्षे त्याचे सर्व अंथरुणात होत आहे. या यातनांतून त्याची केव्हा मुक्तता होईल हे विचारावयास आलो.' भटसाहेब म्हणाले, 'त्याचे ऐकताच मी त्याची नोट परत केली, अक्षरशः त्याच्या पाया पडलो, त्याला म्हटलं, 'तुम्ही जरा बसा. मी सगळं बरोबर सांगतो,' त्यानंतर माझा एकही शब्द चुकला नाही.'

भटसाहेबांचे म्हणणे असे की डॉक्टरांनाही कधी अंतःस्फूर्ति दगा देते व डायग्नोसिस होत नाही तशी ज्योतिषांचीही अंतःस्फूर्ति त्यांना दगा देते.

'पंचमस्थान' या आपल्या नव्या पुस्तकात श्री. व. दा. भट यांनी प्रस्तावनेत भविष्यकथनाची चांगली चिकित्सा केली आहे. आजच्या ज्ञानातील भविष्यकथनाच्या ते चार पायऱ्या किंवा विभाग करितात. त्यांना ते अ. ब. क. ड. अशी नावे देऊन म्हणतात, 'अ' विभागाचे किंवा पायरीचे भविष्य हे दैवाधीन गोष्टींचे भविष्य धरावे. उदाहरणार्थ–आरोग्य, वैवाहिक जीवन, संतती व उपजीविका. हे 'अ' विभागातील गोष्टीबद्दलचे भविष्य सहसा चुकत नाही. 'ब' या विभागातील भविष्य म्हणजे संधिवात, ॲलर्जी, टी. बी., कॅन्सर वगैरेबद्दलचे. 'अ' या विभागातून 'ब' या विभागाकडे वाटचाल करीत असता भविष्यकथनाते चुका होऊ शकतात. त्याहूनही 'क' आणि 'ड' या विभागातील विषयांचे भविष्य कथन करू लागले की, चुका बघावयासच नको. ८५ टक्के मार्कांना मेडिकलला ॲडमिशन मिळते, ८४ टक्केला मिळत नाही. हे ठाऊक असूनही ते भविष्य आम्हाला सांगावे लागते. फोर्टमधून अंधेरीला बदली केव्हा होईल, नवरा पोस्टातला मिळेल की, बँकेतला (पगारात वीस रुपये वाढ करणारे) प्रमोशन केव्हा मिळेल, या 'क' व 'ड' या विभागातील गोष्टींचे भविष्य, आम्हास नीट सांगता येत नसूनही सांगावे लागते.'

मला वाटते श्री. व. दा. भट यांनी केलेली भविष्यकथनाची चिकित्सा मराठीतील या विषयावरची पहिली शास्त्रीय चिकित्सा आहे. हे लक्षण ज्योतिषशास्त्राच्या दृष्टीने चांगले आहे.
□

श्री. के. केळकर व व. दा. भट यांची व्याख्याने अनुक्रमे 'सिंहस्थ' आणि 'विवाहयोग' या विषयांवर झाली. अंतराअंतराने झालेल्या या व्याख्यानांतून दोघांनीही पंचांगातील फापट पसारा कमी केला पाहिजे असे सांगितले. केळकर म्हणाले, संक्रांतिफल हे काढूनच टाकायला हवे. कारण दर साठ वर्षांनी तेच नाव येते व पुन्हा तेच तेच त्यांत सांगितले जाते. व. दा. भट म्हणाले, ज्या वेळी शनिमंगळयुति होती त्या वेळी पंचांगात मुहूर्त सांगितले होते. पंचांगातल्या मुहूर्तांना कसलेच तत्त्व नाही. ज्योतिष हे धर्मशास्त्राशी

निगडित का असावे ? हीच चूक आहे. धर्मशास्त्रांतील गोष्टींचा ज्योतिष्याशी काही संबंध नाही. श्री. के. केळकर म्हणाले, सिंहस्थात लग्न केलं तर मूल होत नाही हा भ्रम आहे. खुशाल लग्न करा. मूळ पत्रिकेत दोष असेल तर केव्हाही लग्न करून त्रास होणारच. म्हणजे मुळांत गुरु-राहू किंवा गुरु-शनि सिंहेत असले तर संततीला अडचण येईल. व. दा. भट, सिंहस्थ थोतांड आहे असे म्हणाले. 'दुःख हे आहे की सिंहस्थासारख्या गोष्टी टाळता येत नाहीत. समाजावर पंचांगाचा परिणाम आहे, ज्योतिषाचा नाही.' ते म्हणाले, लग्नाच्या बाबतींत मी फार दैववादी आहे. लग्न जसं व्हावयाचं तसं होत असतं. श्री. के. केळकर यांच असंच मत मी एकलंय, लग्न ठरवताना पत्रिका पाहू नये. व. दा. भट म्हणाले, मला अजून लग्नाचे बरेच वेळा सांगता आले नाही. म्हणजे विवाह केव्हा होईल ? प्रत्येक पत्रिकेत काही तरी एक 'का नोट' असते. ती लक्षात आली नाही तर सगळे चुकतं. त्यांच्या मते एकदाच पत्रिका पहावी. हीं दुःखे–ती सुखे, हे कळले की पुरे; त्यात बदल होणार नाही.

या विधानामुळे पुन्हा जुना प्रश्न उपस्थित होईल. जर घडायचे ते घडणारच. मग पुढच्या काळातले कशाला जाणून घ्यावयाचे ? का पुढचे कळल्याने काही उपयोग होतो ? एकदा श्री. के. केळकर आमचेकडे आले. त्याना आमच्या पत्रिका ठाऊक होत्या. ते माझ्या बायकोला म्हणाले, 'वाहिनी, सहा महिन्यात तुमच्या धाकटया लेकीला सूर्यदशा येत आहे. तिची प्रकृति तेव्हा बिघडणार आहे.' माझ्या बायकोने त्या सहा महिन्यात लेकीच्या खाण्यापिण्याकडे नीट लक्ष देऊन तिची तब्येत उत्तम केली. खरोखराच पुढे तिला डांग्या खोकला वगैरे दुखणी आली; पण आम्ही आधी काळजी घेतल्याने त्या आजाराचा तिच्यावर फार परिणाम झाला नाही. पुढचे कळल्याने आधी काळजी घेता येते. त्याचप्रमाणे ज्याला पुढचे कळत राहते तो स्थितप्रज्ञ होतो. माझ्या एका मित्राने आपल्या बायकोचा मृत्युदिन लिहून ठेवला होता. स्वतःचा मृत्यूही त्याला कळला होता; पण हे सारे कळून तो इतका शांत असावयाचा. ज्योतिष कळू लागले की वृत्ती स्थिर होत असावी.

पुढचे कळले तर माणूस शहाणा होईल का ? हा असाच नेहमी येणारा प्रश्न. पुढच्या कळण्याच्या होणाऱ्या परिणामावर टॉल्स्टायसारख्या लोकांनी गोष्टी लिहिल्या आहेत. मला वाटते महाभारत–रामायण वगैरेमधील शाप हे भविष्यवाणीच होते. तुझ्या रथाचे चक्र भूमि गिळेल – तुला ऐनवेळी अस्त्रे आठवणार नाहीत, हा कर्णाचा शाप म्हणजे भविष्यच होते. पुढचे कळूनही माणसाला काही करता येणार नाही असे कर्णाच्या अंतावरून कळते. तरी सर्वांना भविष्य जाणून घ्यावेसे वाटते. यामागे माणसाची परावलंबत्वाची चीड आहे. 'माणसाचे भवितव्य माणसाला कळत नाही असे कोण म्हणते ?' हे आव्हान त्यात दिसते. हळुहळु माणूस परमेश्वराच्या हातातून एकेक शक्ति काढून स्वतःकडे घेण्याचा प्रयत्नात आहे. ज्या लोकांना ज्योतिष वगैरेसारखे विषय आवडत नाहीत त्यांना असल्या कल्पनेच्या भराऱ्यांतूनच माणसाची आजची प्रगती झाली आहे हे कळत नसते.

◘

एकोणिसशे सत्तेचाळीस साली मी माझी पत्रिका प्रथम करवून घेतली व लगेच बंबात टाकली. त्या वेळी माझा पहिला कथासंग्रह प्रसिद्ध होऊन (लामणदिवा) वर्ष होऊन गेले होते. माझ्या एका मित्राची फारच ओढ होती. तेव्हा आम्ही दोघांनी ज्योतिषाकडे जाऊन, त्याची व त्याच्याबरोबर माझी अशा दोन्ही पत्रिका तयार करवून घेतल्या. माझ्याबद्दलचे त्याचे एक भविष्य खरे ठरले, 'हा दरिद्री राहणार !' पण 'याला मुलाचे लेढार होणार' हे भविष्य खोटे ठरले. त्याने लेखनाबद्दल काहीच सांगितले नाही. तेव्हा मित्राने माझे एक पुस्तक झाले आहे व माझे लेखक म्हणून नाव होणार का, असे विचारले. तेव्हा त्याने डोक्यावरच्या फळीकडे बोट दाखवून म्हटले, ते पहा आम्ही एक पुस्तक प्रसिद्ध केले त्याचे काय झाले ? गठ्ठे पडले आहेत. तेच त्यांचे होणार. आणखी एखादे पुस्तक होईल. संपले ! मी घरी येऊन पत्रिका जाळून टाकली. आज मागे पहाता त्याचे पैशाचे– भविष्य खरे ठरले. मुलांबद्दलचे चुकले आणि ग्रंथलेखनाचे चुकले. माझी पन्नास पुस्तके झाली आहेत. त्यांचे भविष्य का चुकले, याचा विचार केला की, लक्षात येते की ज्योतिषी जेव्हा स्वतःला विसरू शकत नाही तेव्हा तो चुकतो. माझे लेखनाचे भविष्य सांगताना स्वत:चे लेखनांतले अपयश त्याला मनातून काढता आले नाही. माझ्या मित्राचे भविष्य मात्र खूपच खरे ठरले. त्याला त्याने सांगितले की तू मोटार ठेवण्याइतका पैसा मिळवशील. तुझा बंगला होईल. ते झाले.

यावरून ज्योतिषीलोकांतील एक दोष लक्षात आला. तो सांगून टाकतो. आजचे बहुतेक ज्योतिषी परंपरागत प्रतिगामी विचारसरणीचे आहेत. राजकीय भविष्य सांगताना तर ही त्यांची राजकीय मते त्यांच्या ज्योतिषांतही वरील ज्योतिषासारखी डोकावतात. मी मोठमोठे ज्योतिषी आपल्या प्रवृत्ती दुसऱ्यांच्या भविष्यावर लादताना पाहिले आहेत. ज्योतिषशास्त्राचे ते नुकसान करीत आहेत हे त्यांच्या लक्षात यावे. तसेच बुवाबाजी करणारे ज्योतिषी आणि गंडे-दोरे देणारे, ग्रहांची शांती वगैरे करावयास सांगणारे. ज्योतिषशास्त्राचा व या गोष्टींचा (मंत्रशास्त्र वगैरे) काही संबंध नाही.

पंचांगातील फाफटपसारा कमी केला पाहिजे व धार्मिक रूढींपासून ज्योतिषशास्त्र निराळे करायला हवे हे श्री. के. केळकर व व. दा. भट यांच्यासारखे ज्योतिषी म्हणतात ते बरोबर वाटते. या नव्या विचारसरणीपूर्वी श्री. के. भट वगैरे मंडळींनी नक्षत्रफलादेश मंडळ चालविले होते. ज्योतिषाचा पाया शास्त्रशुद्ध करण्याचा त्यांचा हेतू होता. कोणत्या योगाने नेमकी कोणती गोष्ट होते हे कळण्यासाठी श्री. के. भटांनी हजारो पत्रिका जमविल्या. दशमात मंगळ असलेला, सर्जनपासून स्वयंपाक्यापर्यंत कुणीही होऊ शकतो. तो नेमका कोण होईल, हे शोधण्यास दशमात मंगळ असलेल्या शेकडो पत्रिका त्यांनी गोळा केल्या. अशा प्रत्येक विषयाच्या त्यांच्याजवळ शेकडो पत्रिका आहेत.

शास्त्रीय अभ्यास तो हा. ग्रह-नक्षत्रफलादेश मंडळाने असे अनेक अभ्यासू तयार केले. आता वि. द. घिटे व त्यांचे सहकारी त्याच पद्धतीने ज्योतिष विज्ञान मंडळ चालवीत आहेत. सर्व वयांची ३५–४० स्त्री-पुरुष मंडळी त्यांच्या व्याख्यानांना असतात. व्याख्यानाचा खर्च भागविण्यास ते दर डोई चार आणे घेतात. ही स्त्री-पुरुष मंडळी हातात वही-पेन घेऊन आलेली असतात. त्यात सर्व क्षेत्रांतली मंडळी दिसतात आणि समोरच्या फळयावर परमेश्वराची पत्रिका मांडली तरी त्याबद्दल प्रश्न व शंका विचारण्यास ती कचरत नाहीत. ◻

## परराष्ट्रीय घडामोडी : पृष्ठ ४ वरून

टाकणारीच आहे.एकतर्फी जाहीर केलेले धोरण एकतर्फीच मागेही घेतले जाऊ शकेल असे या राजदूताचे म्हणणे आहे. ते टाळण्यासाठी द्विपक्षीय करार करणेच उचित असेही त्याने सांगितले. भारताच्या अणुस्फोटानंतर आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये व आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर, जेव्हा संधी मिळेल तेव्हा, पाकिस्तानने तोंडसुख घेतलेले आहे. भारताच्या अणुस्फोटामागचा हेतू पाकिस्तानने अण्वस्त्र-उत्पादन हा गृहीत धरलेला असल्याने द्विपक्षीय कराराची राजदूताने तयारी दाखवावी यात नवल नाही.

या प्रकरणात लिबियाने अमाप पैसा ओतला आहे. सौदी अरेबियानेही काळ्या सोन्याची थैली खुली केली होती. त्यामुळे त्यांची ते किती किंमत वसूल करतात हे पहायचे. जर त्यांना पाकिस्तानकडून अण्वस्त्रे विकण्यात आली अगर तंत्रज्ञान देण्यात आले तर मध्यपूर्वेचा प्रश्न एकदम निराळ्या पातळीवर जाईल. अण्वस्त्रे वापरली नाहीत तरी ती 'आहेत' एवढ्या एकाच गोष्टीवर शक्तींचे संतुलन ठरते. इस्त्राएलला यापुढे अरबांशीच सामना करावा लागणार आहे. त्याचा परंपरागत शत्रू इजिप्त, आता शत्रू राहिलेला नाही. म्हणूनच या बाँबला 'इस्लामिक बाँब' म्हणण्यात येत आहे. इस्लामच्या पुनरुज्जीवनाची जी लाट उसळली आहे तिच्याच भरतीच्या वेळी हा बाँब तयार होण्याची शक्यता निर्माण व्हावी ही फार महत्त्वाची गोष्ट आहे. अमेरिकेवर असंतुष्ट असणाऱ्या अरबांच्या हातात आता साधन मिळाले आहे.

भारतीय उपखंडाच्या संदर्भात तर ह्या घटनेला फारच महत्त्व आहे. काश्मीरचा प्रश्न हे जवाहरलाल नेहरूंच्या नाकर्त्या धोरणाचे फळ आहे. ते आधी अवघड जागेचे दुखणे झालेले आहेच, आता तर ते चिघळणार. काश्मीर प्रश्नासाठी अणुशक्तीची तरफ वापरणे पाकिस्तानला सोयीचे जाईल. चीनचे यात फावेल. कारण फक्त अणुविज्ञान मिळाले किंवा अण्वस्त्रे निर्माण करता आली, म्हणजे पाकिस्तान बलवान झाले असे मानता येणार नाही. राजकीय, सामाजिक स्थैर्य त्या देशात नजीकच्या भविष्यात तरी प्रस्थापित होईल असे दिसत नाही. अशा स्थैर्याखेरीज परराष्ट्रीय धोरणे नीट आखता येत नाहीत. त्यामुळे जवळची बडी शक्ती या नात्याने चीनच याचा फायदा उठवण्याची शक्यता आहे. रशियाची प्रतिक्रिया अर्थातच पाकिस्तानविरोधाची आहे. अफगाणिस्तानवरील पकड अधिक घट्ट करणे याखेरीज रशियाच्या हातात सध्या फारसे काही नाही.

एक महत्त्वाचा मुद्दा या प्रकरणी लक्षात घ्यायला हवा, तो म्हणजे पाकिस्तानने ज्या तंत्रज्ञानावर त्याचा प्लँट उभारला आहे, ते अतिशय प्रगत आहे. 'गॅस सेन्ट्रिफ्यूज' या नावाने हे नवे तंत्र ओळखले जाते. त्यामुळे पाकिस्तानला Enriched uranium ची बाहेरून फारशी जरुरी लागणार नाही. आपल्याकडे हे तंत्रज्ञान नाही. आपले तंत्रज्ञान अतिशय खर्चिक आणि परंपरागत आहे. त्यामुळे आपल्याला वारंवार बाहेरून ते मिळवावे लागते. कॅनडा आणि अमेरिका दोघांनीही आपल्याला Enriched uranium पाठवण्याविषयी खळखळ केली आणि अमेरिकेने तर अडवणूकच केलेली आहे. या युरेनियमअभावी आपल्याला काहीही करता येणे अशक्य आहे. पाकिस्तानकडे मात्र आजच युरेनियमचा भरपूर साठा आहे आणि आधुनिक स्वस्त तंत्रज्ञान त्याच्या मदतीला आहे. त्यामुळे त्याला बाकी कोणाची फारशी जरुरी लागणार नाही.

स्वयंपूर्णतेने अण्वस्त्रे बनवण्याची पाकिस्तानची क्षमता हा बड्या राष्ट्रांच्याच हेतुपुरस्सर दुर्लक्षाचा परिणाम आहे. एकदा

**तीन राजहंस प्रकाशने**

**आणि ड्रॅगन जागा झाला!**
लेखक : अरुण साधू । मूल्य : चवदा रुपये

**फिडेल चे, आणि क्रांती**
लेखक : अरुण साधू । मूल्य । सात रुपये

**पूर्णिया**
लेखक : अनिल अवचट । मूल्य : सहा रुपये

१०२५ सदाशिव, पुणे ४११०३०

ही क्षमता प्राप्त झाल्यावर त्यांचे व पाकिस्तानचे संबंध बिघडायला फारसा वेळ लागणार नाही.

याचीही सुरुवात झालेलीच आहे. इस्लामाबादजवळ ३५ कि. मी. वर या ऊर्जा प्रकल्पाजवळ फ्रेंच राजदूताला आणि त्याच्या फर्स्ट सेक्रेटरीला परवाच मारहाण करण्यात आली. वस्तुतः फ्रान्स हा पाकिस्तानचा याबाबतीतील पहिला मदतनीस. केवळ पैशाच्या लोभाने फ्रान्सने अमेरिकेप्रमाणेच आजवर अनेक धोक्याचे व्यवहार सुरक्षेचा विचार न करता केलेले आहेत. मॉरिटॅनिया हे त्याचे ताजे उदाहरण. त्यातलाच हाही एक प्रकार; पण पाकिस्तान एकदम एवढे प्रबळ होईल याची कल्पना नसल्याने फ्रान्सही गडबडला असावा. भुट्टोने त्याच्या कारकीर्दीत मान्य केलेला करार झियाउल हकच्या कारकीर्दीत पुढे चालवण्यास फ्रान्सने बरीच अनिश्चितता दर्शवली, राजदूताला झोडपणे ही गंभीर बाब झाली. त्याबाबत झिया उल्हकने खेदाचे पत्र पाठवले आहे आणि फ्रान्सनेही कडक निषेध पॅरिसमधल्या पाकिस्तानी राजदूताकडे नोंदवला आहे.

२८ जूनला वाजपेयी फ्रेंच पंतप्रधान रेमाँ बार याला भेटले. त्या भेटीतही पाकिस्तान अण्वस्त्रे बनवू शकेल असे कोणतेही तंत्रज्ञान फ्रान्स पाकिस्तानला देणार नाही असे वाजपेयींना सांगण्यात आले; पण आता बहुधा पुरेसा उशीर झालेला आहे.

अमेरिकेने पाकिस्तानची मदत तोडल्यापासून पाकिस्तान अरब राष्ट्रांच्या जवळ सरकले तेव्हा फ्रान्सने त्याला मदत केली ती आततायीपणे. भारतीय उपखंडातले अस्थैर्य हे बड्या शक्तींना नेहमीच फायद्याचे वाटत आलेले आहे. त्याच वेळी अरब राष्ट्रांप्रमाणेच वैयक्तिक कारणानेही पाकिस्तानने अमेरिकेला प्रत्युत्तर म्हणून बॉम्ब बनवला. ब्रिटनच्या संसदेत गतवर्षी प्रथम या चोरलेल्या कच्च्या मालाचा प्रश्न उठवण्यात आला होता तेव्हा आणि नंतर मोरारजी देसाईंनी जेम्स कॅलॅहनला पत्र लिहिले तेव्हा, ब्रिटनने उडवाउडवीची उत्तरे दिली. ब्रिटनला पाकिस्तान ही भारताला शह द्यायला पाचर म्हणून नेहमीच उपयोगी वाटत आलेली आहे; पण अण्वस्त्रक्षमता आली म्हटल्यावर ब्रिटनने चिंता व्यक्त करताच ख्रिस शेरवेल या BBC आणि Financial Times च्या वार्ताहराला बदडण्यात आले. तो याविषयीची माहिती गोळा करत होता. अब्दुल कादर खान या हॉलंडमधून तंत्रज्ञान चोरणाऱ्या शास्त्रज्ञाच्या घराबाहेर तो उभा असता हा प्रकार घडला. अब्दुल कादर खान सध्या इस्लामाबादच्या जवळच्या प्रयोगशाळेत काम करतो अशी शेरवेलने पाठवलेली बातमी होती.

या वरच्या पातळीवरच्या मारहाणी सद्यःस्थितीत पाकिस्तानी सामान्य गुंड करू शकणार नाही. यामागे सरळ सरकारचाच हात आहे आणि बड्या राष्ट्रांना दिलेले ते एक स्वच्छ उद्धट उत्तर आहे.

भारत Nuclear Nonproliferation Treaty वर अपमानास्पद अटींवर कधीही सही करणार नाही हे पाकिस्तानला ठाऊक आहे. म्हणून आपली NPT वर सही करायला हरकत नाही असे पाकिस्तानचे तिरकस म्हणणे आहे.

अणुतंत्रज्ञानाचे इतर परिणाम म्हणजे सध्या तरी झियाउलहकचे राजकीय आयुष्य वाढले आहे. कोणताही निर्णय घेण्याची ताकद नसलेला राष्ट्रप्रमुख अशी जी त्याची प्रतिमा निर्माण झाली आहे तिला या गोष्टीने जरा बगल मिळेल. पाकिस्तानचे विघटनही पर्यायाने जरा लांबणीवर पडेल.

भारत–पाकसंबंध आता बराच काळ संदिग्ध व परस्पर संशयाने भरलेले रहातील.

व्यक्तिशः मला असे वाटते की, मुस्लिम राष्ट्रांमध्ये आता 'इस्लामिक' बाँबनंतर फूट पडायला सुरुवात होईल. जोपर्यंत अणुविज्ञान नव्हते, तोपर्यंत ते मिळवण्यासाठी हे एकत्र राहिले; पण आता ते नजरेच्या टप्प्यात आल्यावर, मारामाऱ्या सुरू होतील. पाकिस्तान सुखासुखी तंत्रज्ञान देणार नाही, कोणाला प्राधान्य द्यायचे यावर दुमत सुरू होईल. त्यात इराक-सीरिया एकच संघराज्य बनू पहात आहेत. ते लीबियाच्या गडाफीला पसंत नाही, तो या अणुबाँबचा फायनान्सर, त्याचे इजिप्तइतकेच इराकशीही वैर आहे.

या साऱ्या गुंतागुंतीतून काही भले निघेल अशी आशा काय जोरावर करणार? □

## निवडक एकांकिका : १९७८

'सुपर्ण प्रकाशना'तर्फे निवडक एकांकिका, १९७८ ह्या पुस्तकाच्या प्रकाशनाची तयारी चालू असून पुस्तकाचे संपादन प्रा. प्र. ना. परांजपे करीत आहेत. जानेवारी ते डिसेंबर १९७८ या काळात प्रसिद्ध झालेल्या एकांकिकांचा या संग्रहासाठी विचार केला जाणार आहे. एकांकिकांच्या लेखकांनी आणि एकांकिकेबद्दल आस्था असणाऱ्या वाचकांनी एकांकिकांच्या मुद्रित प्रती, नियतकालिके, संदर्भ पाठवून सहाय्य करावे अशी विनंती आहे. प्रती व संदर्भ कृपया १० जुलैपर्यंत पाठवावेत ही विनंती.

**—वसंत मिरासदार**
सुपर्ण प्रकाशन

हिंदी चित्रपट । सदानंद बोरसे

# जानी दुश्मन

## भीतिपट – ज्यात भीतीशिवाय सर्व वाटते

विवाहेच्छू तरुणांसाठी एक खास धोक्याची सूचना – हिमालयाच्या पायथ्याच्या गावांमध्ये राहणाऱ्या तरुणीशी जर तुमचे लग्न ठरु घातले असेल; तर तिला विवाहानंतर डोलीतून आणताना लाल रंगाचे कपडे घालू नका. कारण होते काय की, इतर वेळी गावाची व गावकऱ्यांची सर्वतोपरी काळजी घेणारी त्या गावातील जी ठाकूरमंडळी असतात; त्यांच्या नजरेला ही वधूची लाल वस्त्रे पडली की, त्यांचे रूपांतर एकदम भुतात होते आणि ते त्या वधूचा खून करून टाकतात.

ही सूचना वाचल्यानंतर घबराटीची एक मोठी लाट उसळली; पण मग निर्माता-दिग्दर्शक राजकुमार कोहलींनी 'जानी दुश्मन' या नावाचा एक चित्रपट काढून अशी माहिती उघडकीस आणली की, त्या भूत-घराण्याचा मूळ पुरुष रझा मुराद: तो अमरीश पुरीच्या शरीरात शिरला. अमरीश पुरी मेल्यानंतर त्याने संजीवकुमारच्या देहाचा आश्रय घेतला. अखेर संजीवकुमारने स्वत: मरता मरता त्यालाही मुक्ती दिली, तेव्हा एक दगडी भिंत फोडून तो मुक्त झाला. तेव्हा आता या भुतापासून घाबरण्याचे कारण नाही.

इतका उपयुक्त चित्रपट पाहिलाच पाहिजे; म्हणून गेलो आणि काही प्रश्नांचे उलगडे झाले, काही शंका उपस्थित झाल्या.

१. भूत म्हणजे काय ?

भूत म्हणजे अतृप्त आत्मा. आपल्या इच्छा पूर्ण व्हायच्या आत जर कोणी मेले, तर त्याचा आत्मा जिवंत माणसाच्या शरीरात प्रवेश करून आपल्या इच्छा पूर्ण करून घेतो. (पुरुष मेला की भूत व स्त्री हडळ होते.) शंका–या आधी सांगितलेल्या भूत घराण्याचा मूळ पुरुष रझा मुराद याने त्याचा खून झाल्यावर अखिल स्त्रीजातीचा सूड घेण्यासाठी नववधूंचे खून सुरू केले. आता रझा मुरादला मुक्ती मिळाली आहे; पण ज्या नववधूंचे त्या भुताने खून केले, त्यांच्या अतृप्त इच्छांचे काय ? सूडाने पेटून हडळी झाल्यानंतर त्या नववधूंनी अन्य भुतांचे (म्हणजे पुरुष-भुते) खून सुरू केले आहेत. त्यामुळे समस्त भूत-जमातीत घबराट पसरल्याची बातमी ऐकिवात आहे. ती कोहलीसाहेबांच्या कानांवर आली आहे का ? त्यावर ते भुतांसाठी एखादा खास चित्रपट काढून त्यांना मार्गदर्शन करणार आहेत का ? त्यासाठी आवश्यकता वाटल्यास त्यांनी भूत बनून काही दिवस भुतांच्या व या खुनी हडळींच्या सहवासात राहावे.

२. भूत कसे दिसते ?

अस्वलाचा केसाळपणा आणि गोरिलाचा चेहरा असलेले भूत भीतिदायक न वाटता अतिशय विनोदी व गमतीदार वाटते, याशिवाय भुताच्या पापण्यांची उघडझाप होत नाही. Exorscist नावाचा सिनेमा पाहिल्यावर मला ज्ञानसागरातील एक शिंपला सापडला की, एखाद्या माणसाला भुताने झापटले की, त्याची मान १८० अंशात वळू शकते. 'जानी दुश्मन'मध्ये आणखी एक शिंपला सापडला. खरे भूत जास्त पॉवरबाज असल्याने त्याची मान तर ३६० अंशांतून आणि तीही कितीही वेळा गरगरा फिरू शकते. शिवाय भुताचा जीव त्याच्या हृदयात असल्यामुळे त्याच्या बाकी शरीराच्या कोणत्याही भागावर कोणत्याही शस्त्राचा परिणाम होत नाही.

शंका–हडळ कशी दिसते ? तिचा जीव कुठे असतो ? (या शंकांची उत्तरे बहुधा पुढच्या चित्रपटात कोहलीसाहेब देतीलच) आपआपसातील मारामारीसाठी भुते कोणती शस्त्रे वापरतात ?

३) हिमालयाच्या पायथ्याशी वसलेल्या गावातील लोकांचे पोषाख कसे असतात ?

गावातील लोकांमध्ये दोन गट असतात. एक अल्पसंख्यांक आणि दुसरा बहुसंख्यांक. बहुसंख्यांकांना एक्स्ट्रॉ असे दुसरे नाव आहे. त्यांना पोषाखाच्या निवडीचे फारसे अधिकार नसतात, सरसकट सर्वांना धोतर, कुडता वगैरे वापरावे लागते. अल्पसंख्यांक जमात हीरो म्हणूनही ओळखली जाते. त्यांना निरनिराळ्या चमत्कारिक व भडक रंगांचे सुटापासून सफारीपर्यंतचे सूट आणि गमबूट (तेही चमत्कारिक रंगसंगती करून–उदा.–मरून रंगाचा सूट आणि हळद–पिवळे गमबूट) वापरण्याचे खास अधिकार बहाल केलेले असतात. शिवाय ही अल्पसंख्यांक मंडळीही फॅशनच्या आपल्या हक्काचे रक्षण करण्यात अत्यंत जागरूक असतात. स्त्रियांच्या पोषाखाबद्दल असा फरक फारसा जाणवला नाही.

या चित्रपटात प्रेमाचे त्रिकोण किती आहेत, ही एक मला न आकळलेली गोष्ट आहे. मी ओळखलेले त्रिकोण म्हणजे सुनील-दत्त–रीना रॉय–शत्रुघ्न सिन्हा, रीना रॉय–सुनील दत्त–बिंदिया गोस्वामी. रीना रॉय–शत्रुघ्न सिन्हा–रेखा, जितेंद्र–नीतू सिंग–अनामिक, रझा मुराद–शीतल–अनामिक, जगदीप–मीना टी–पेंटल. जाणखीही बऱ्याच जणांच्या बाबतीत हा 'माझे चित्त तुझ्यापाशी अन्–' असा प्रकार असण्याची शक्यता मी नाकारत नाही.

चित्रपटाच्या शेवटच्या बुडीत हाती आलेल्या ज्ञानसागराच्या शिंपल्यात एक मोती होता. 'भीतिपट म्हणजे काय ?' या प्रश्नाचे उत्तर मला गवसले. जो चित्रपट पाहताना भीतीशिवाय सर्व काही वाटते, तो भीतीपट. त्या दृष्टीने 'जानी दुश्मन' हा एक आदर्श भीतिपट आहे. □